गुरुर्गुरुतमो धाम
NCTE

शिक्षण मंत्रालय
MINISTRY OF EDUCATION

सत्यमेव जयते

NATIONAL MISSION FOR MENTORING

# सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान

## मार्गदर्शिका

**Marathi/मराठी**

# राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद

जी-७ , सेक्टर -१० द्वारका , नवी दिल्ली -११००७५

NMM

NATIONAL MISSION FOR MENTORING

*सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान चे बोधचिन्ह (National Mission for Mentoring (NMM)) सदुपदेशक व सदुपदेशग्रही यांच्या सहयोगाला सूचित करते, जिथे परस्पर व्यावसायिक विकासासाठी क्षमता वाढीसाठी, शिकण्याची, मनन  करण्याची आणि सामायिक करण्याची भावना वाढवली जात आहे. या लोगोमध्ये, केशरी रंग सकारात्मकता, आशावाद, गतिशीलता, उत्साह आणि उबदारपणा दर्शवतो आणि शाही निळा रंग शहाणपण, विश्वासार्हता आणि जबाबदारी दर्शवतो. हे सर्व गुणधर्म सदुपदेशनासाठी आवश्यक आहेत.*

**Dharmendra Pradhan**
Hon'ble Education Minister;
Skill Development and
Entrepreneurship
Government of India
Shastri Bhawan
New Delhi-110001

**धर्मेंद्र प्रधान**
**माननीय शिक्षण,कौशल्य विकास आणि**
**उद्योजकता मंत्री,**
**भारत सरकार,**
**शास्त्री भवन**
**नवी दिल्ली- ११०००१**



## संदेश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (National Education Policy (NEP) 2020) मध्ये परिवर्तनशील शैक्षणिक प्रणालीची कल्पना केली आहे जी प्रत्येक विद्यार्थ्यासाठी सर्वसमावेशक आणि समान शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी शिक्षकांना सक्षम करेल. परंतु हे ध्येय एका महत्त्वाच्या घटकावर अवलंबून आहे आणि तो म्हणजे : सक्षम शिक्षक.

आपल्या राष्ट्राचे भविष्य घडवण्यासाठी शिक्षकांची असलेली महत्त्वाची भूमिका हे धोरण ओळखते. या दृष्टीकोनाशी सुसंगतपणे, सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियानाचे उद्दिष्ट भारतातील सर्व शालेय शिक्षकांना सदुपदेशनासाठी तयार करणे आणि सदुपदेशकांचे जाळे तयार करणे हे आहे. हे शिक्षकांना त्यांच्या शिकवण्याच्या पद्धती सुधारण्यासाठी आणि त्यांची एकूण व्यावसायिक वाढ आणि विकास करण्यासाठी समर्थ आणि सक्षम करतील. हे मिशन केवळ सहाय्यासाठी नाही तर हे क्षमता तयार करण्याबद्दल आहे. कठोर आणि निरंतर मार्गदर्शनाद्वारे, शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव निर्माण करण्यासाठी, त्यांची कौशल्ये विकसित आणि परिष्कृत करण्यास सक्षम असतील.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (National Council for Teacher Education- NCTE) ने सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान वर मार्गदर्शिका (ब्लूबुक) विकसित केली आहे. हा सर्वसमावेशक दस्तऐवज हस्त पुस्तिकेपेक्षाही अधिक आहे. स्पष्ट उद्दिष्टे, प्रभावी धोरणे आणि शिक्षक आणि सदुपदेशक या दोघांसाठीही व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वे दाखविणारा उत्कृष्ट असा दिशादर्शक आहे. एक भावी पिढी जी केवळ बदलणाऱ्या या जगात टिकून राहण्यासाठी नाही तर भरभराटीसाठी तयार असेल. अशा भावी पिढी मध्ये 21 व्या शतकातील कौशल्य विकसित करणाऱ्या शिक्षकाला एक सुनियोजित असा आराखडा देते.

या उपक्रमाचे नेतृत्व केल्याबद्दल मी एन.सी.टी.ई चे मनापासून कौतुक करू इच्छितो. मला विश्वास आहे की हा दस्तऐवज शिक्षक आणि सदुपदेशकांसाठी एक मौल्यवान संसाधन म्हणून काम करेल आणि त्यांना अध्ययन आणि अध्यापनाच्या उत्कृष्टतेकडे मार्गदर्शन करेल.

**धर्मेंद्र प्रधान**

## संदेश



**अन्नपूर्णा देवी**
माननीय शिक्षण राज्यमंत्री
शिक्षण मंत्रालय
भारत सरकार

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ने एन.एम.एम वर ही मार्गदर्शिका (ब्लूबुक)अत्यंत बारकाईने तयार केलेली आहे, त्यात महत्त्वपूर्ण व नाविन्यपूर्ण टप्पे आहेत. सदुपदेशग्रही म्हणून काम करणाऱ्या शाळेतील शिक्षकांसाठी विविध व्यावसायिकांना सदुपदेशक म्हणून ओळखून, नॅशनल मिशन फॉर मेंटॉरिंग शिक्षणासाठी एक परिवर्तनवादी दृष्टीकोन सादर करते. सदुपदेशक व सदुपदेशग्रही यातील गतिमान परस्परसंवादासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करून, हे अभियान एकमेकांच्या व्यावसायिक वाढीला आकार देण्यासाठी शिक्षकांच्या अमूल्य भूमिकेवर भर देते. हा दस्तऐवज एन.सी.टी.ई टीमचे समर्पण प्रतिबिंबित करणारा आहे. या महत्त्वपूर्ण शिक्षक-केंद्रित कार्यक्रमात सर्वसमावेशक अंतर्दृष्टी प्रदान करणारा हा दस्तऐवज आहे.

मी त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा करते आणि आपल्या देशात सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान चे शिक्षकांना सक्षम बनवण्याची आणि प्रबुद्ध शिक्षणाचे भविष्य घडवण्याची अपेक्षा करते.

यशाची शुभेच्छा.

---

## संदेश




**संजय कुमार**
भारतीय प्रशासनिक सेवा
सचिव
शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग
शिक्षण मंत्रालय
भारत सरकार

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये लवचिकता, सर्जनशीलता आणि अध्ययन अध्यापनातील नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देऊन दर्जेदार शिक्षणावर भर देण्यात आला आहे. शिक्षकांसाठी, सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान व्यावसायिक आणि तज्ज्ञांसाठी असे व्यासपीठ प्रदान करेल जिथे ते सदुपदेशग्रही शिक्षकांसोबत सदुपदेशक म्हणून ज्ञान, कौशल्ये आणि आपली तज्ज्ञता सामायिक करू शकतील आणि प्रभावी शिक्षक बनण्याच्या त्यांच्या प्रवासात त्यांना मदत करू शकतील. सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियानावरील ही सर्वसमावेशक मार्गदर्शिका (ब्लु बूक), सदुपदेशनाच्या संकल्पनेपासून या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीपर्यंत संपूर्ण मार्गदर्शन प्रदान करते.

सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान वर मार्गदर्शिका ची संकल्पना मांडण्यासाठी आणि आणि त्यावरील ही मार्गदर्शिका तयार करण्यासाठी मी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद चे अभिनंदन करतो.

हार्दिक शुभेच्छा.



**प्रो. योगेश सिंह**

अध्यक्ष , राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद , नवी दिल्ली

## संदेश

शैक्षणिक आकांक्षा पूर्ण करण्यासाठी, प्रभावी शिक्षकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० भर देते. २१ व्या शतकातील मागण्यांसाठी सदुपदेशन नातेसंबंधांची शक्ती ओळखते, शिक्षक आणि नेत्यांना समर्थन देते. सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान संरचित सदुपदेशन संबंधांद्वारे संस्थात्मक सहाय्य प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे. सदुपदेशनावरील ही मार्गदर्शिका शिक्षकांना भविष्य घडवण्यास सक्षम करेल तसेच, चिकित्सक विचार आणि समायोजनशीलता वाढवेल. मी सर्व शिक्षकांना विनंती करतो की या संधीचे सोने करून या अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा.

हा दस्तऐवज तयार करण्यासाठी मी एन.सी.टी.ई कृती गटाचे त्यांच्या अनुकरणीय कार्याबद्दल प्रामाणिक कौतुक करतो. चला सहकार्याने आपल्या शाळांमध्ये आणि व्यापक शिक्षण समुदायामध्ये सदुपदेशनाची व सहाय्याची संस्कृती निर्माण करूया.

---



**केसांग यांगजोम शेरपा**

भारतीय राजस्व सेवा

सदस्य सचिव

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद

नवी दिल्ली

## संदेश

शिक्षकांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, एन.ई.पी २०२० चा आधारशिला म्हणून ओळखून, एन.सी.टी.ई ने सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियान हे शिक्षकांच्या सहाय्यासाठी आदर्श बदल सादर केले. भौगोलिक सीमा पार करून आणि भौतिक अडथळे दूर करून, एन.एम.एम अखंड 'सदुपदेशक व सदुपदेशग्रही यातील संबंध तंत्रज्ञानाचा वापर करून वाढवते. वैयक्तिक गरजांनुसार जवळचे आणि सातत्यपूर्ण सदुपदेशन करण्यासाठी हा डिजिटल दुवा मदत करतो. अनुभवी व्यावसायिक सदुपदेशक म्हणून व्हर्च्युअल सल्लामसलत आणि सहयोगी माध्यमांद्वारे (प्लॅटफॉर्मद्वारे) सदुपदेशाग्रहीना मार्गदर्शन करतात. एन.एम.एम वरील ही मार्गदर्शिका या अभियानाबद्दल सर्वसमावेशक अंतर्दृष्टी देते.

एन.एम.एम शिक्षकांना सक्षम बनवणा-या आणि भारतीय शिक्षणासाठी उज्वल भविष्य घडवणा-या माझ्या वरिष्ठांचे, समर्पित भावनेने काम करणाऱ्या एन.सी.टी.ई संघाचे आणि सर्व सहभागी जणांचे मी आभार मानते.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रास्ताविक | I-V |
| अनुक्रमणिका | VII |
| आकृत्यांची यादी | X |
| सारण्यांची यादी | X |
| कार्यकारी सारांश | XI |
| **प्रकरण १: भारतातील शिक्षण** | |
| १.१ भारतातील शिक्षण: सद्यस्थिती | 2 |
| १.२ शिक्षकांची भूमिका | 3 |
| १.३. जटिल आणि उदयोन्मुख आव्हाने | 4 |
| १.४. समर्पकता आणि संदर्भ | 4 |
| १.५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) सदुपदेशनसाठी दृष्टी | 5 |
| १.५.१ विद्यार्थ्यांसाठी | 5 |
| १.५.२ शिक्षकांसाठी | 5 |
| १.५.३ शाळा प्रमुखांसाठी | 5 |
| १.५.४ शैक्षणिक नेते आणि संस्थांसाठी | 6 |
| **प्रकरण २: सदुपदेशनाचा परिचय** | |
| २.१. सदुपदेशनाची संकल्पना | 8 |
| २.२ सदुपदेशनाची तत्त्वे | 9 |
| २.३. सदुपदेशनाशी संबंधित सामान्य गैरसमज | 10 |
| **प्रकरण ३: राष्ट्रीय सदुपदेशन अभियानाची ओळख** | |
| ३.१ राष्ट्रीय सदुपदेशन अभियानाची गरज | 12 |
| ३.२ अभियान कसे साध्य केले जाईल? | 12 |
| ३.३ मिशनचे अपेक्षित परिणाम काय आहेत? | 15 |
| **प्रकरण ४ : सदुपदेशनासाठी उपाय** | |
| ४.१ सदुपदेशक निवड | 18 |

४.१.१ सदुपदेशक निवड प्रक्रिया 18

४.२ सदुपदेशकांचे गुणधर्म 18

४.३ सदुपदेशग्रहीची वैशिष्ट्ये 21

४.४ सदुपदेशक विकास 22

४.४.१ सदुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम 22

४.४.१.१ सदुपदेशनाची मूलतत्त्वे (मुख्य कौशल्ये) 23

४.४.१.२ सदुपदेशनाचे प्रकार 23

४.४.२ सदुपदेशकांसाठी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास 26

४.५ सदुपदेशनाची क्षेत्रे 27

४.६ सदुपदेशन परस्परसंवाद 30

**प्रकरण ५: सदुपदेशन कार्यक्रमाचे घटक**

५.१. कार्यक्रम आकृतिबंध आणि नियोजन 32

५.१.१ सदुपदेशकाची प्रगती 32

५.२ कार्यक्रमाचे व्यवस्थापन 33

५.३ कार्यक्रम संचालन 33

५.३ .१ भूमिका आणि जबाबदाऱ्या 34

५.३.२ विविध टप्प्यांमध्ये सदुपदेशन कार्यक्रमाच्या संचालनासाठी शिफारसी 35

५.४ कार्यक्रमाचे मूल्यमापन 36

५.५. संस्थात्मक रचना 39

५.६ प्रोत्साहन 40

५.७. सदुपदेशन कार्यक्रमासाठी आव्हाने 41

५.८ तक्रार निवारण यंत्रणा 43

**प्रकरण ६: राष्ट्रीय सदुपदेशन पायाभूत सुविधा**

६.१ प्रस्तावना 46

६.२ डिझाइन तत्त्वे 46

६.३ सदुपदेशक-सदुपदेशनग्रही परस्परसंवाद सक्षम करणे 48

६.४ तंत्रज्ञानाचे घटक 49

६.५ संयुक्त सदुपदेशन प्रणाली 50

६.५.१ शोधक्षमता 50

६.५.२ विश्वास 50

६.६ संयुक्त सदुपदेशन नेटवर्क 50

६.७ मंच (प्लॅटफॉर्म) प्रशासन 51

**प्रकरण ७: प्रवास आणि पुढील मार्ग**

७.१ एन.एम.एम प्रवास 54

७.२ पुढील दिशा 54

**संदर्भ** 56

**परिशिष्टे** 57

परिशिष्ट-१ 58

परिशिष्ट- २ 61

परिशिष्ट- ३ 63

परिशिष्ट- ४ 64

# आकृत्यांची यादी


| | |
|---|---|
| आकृती १.१: भारतातील शिक्षण | 2 |
| आकृती १.२: शिक्षकाची भूमिका | 3 |
| आकृती ३.१: परस्परसंवादात गुंतलेले आणि एक गट म्हणून ध्येयाकडे प्रगती करणारे कलाकार | 13 |
| आकृती ३.२: सदुपदेशन करणारे कलाकार | 14 |
| आकृती ३.३: लाभार्थीमधील (भागधारकांमधील) परस्परसंवादाची तत्त्वे | 14 |
| आकृती ३.४: मिशनचे प्रमुख टप्पे | 15 |
| आकृती ५.१: सदुपदेशकाची प्रगती | 33 |
| आकृती ५.२: मार्गदर्शनासाठी मूल्यांकन प्रमाणक | 37 |
| आकृती ६.१: राष्ट्रीय मार्गदर्शन पायाभूत सुविधांची डिझाइन तत्त्वे | 46 |
| आकृती ६.२: तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांवर सक्रिय केलेले मुख्य क्रियापद | 48 |
| आकृती ६.३: संयुक्त सदुपदेशन नेटवर्क (यूएमडब्ल्यू) - घटकांचा स्तरीय देखावा | 49 |
| आकृती ७.१: पुढील दिशा | 55 |


# सारण्यांची यादी


| | |
|---|---|
| सारणी ४.१: कौशल्ये, घटक आणि वर्णन | 23 |
| सारणी ४.२: सदुपदेशनाच्या पद्धती | 26 |
| सारणी ४.३: सदुपदेशक प्रशिक्षण आणि कौशल्याची पातळी | 26 |
| सारणी ४.४: सदुपदेशनाची क्षेत्रे व व्याख्या | 27 |
| सारणी ५.१: भागधारक आणि जबाबदाऱ्या | 34 |
| सारणी ५.२: उद्दिष्ट आणि प्रभाव निर्देशक | 39 |
| सारणी ५.३: प्रोत्साहनाचे प्रकार | 40 |
| सारणी ६.१: निकष आणि प्रश्न | 51 |

# कार्यकारी सारांश

भारतातील विविध स्तरांवरील शैक्षणिक कार्यकर्त्यांना, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मोठ्या मिशनमध्ये प्रभावीपणे योगदान देण्यासाठी शिक्षकांना सतत शिकण्याची आणि विकासाची गरज भासली आहे. 'ब्लूबुक ऑन मेंटोरिंग' ही वाढती गरज पूर्ण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. 'मेंटोरिंग', हा शब्द एखाद्या क्षेत्रात अनुभवी असलेल्या व्यक्ती (सदुपदेशक ) आणि त्या अनुभवापासून शिकायचे असलेल्या व्यक्ती (सदुपदेशग्रही) यांच्यातील संवादांच्या रचनेचा संदर्भ देतो, हा या ब्लूबुकचा गाभा आहे. प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या कौशल्याचा फायदा घेण्यासाठी उपाय म्हणून 'मार्गदर्शक' शोधून शिक्षण क्षेत्रातील विविध भागधारकांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करण्याचा प्रयत्न करते.

ही मार्गदर्शिका (ब्लूबुक) सात वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये विभागलेली आहे-

*पहिल्या प्रकरणात* भारतातील शिक्षणाच्या सद्य स्थितीबद्दल थोडक्यात संदर्भ दिला आहे. यात आतापर्यंत राबविलेल्या शासकीय उपक्रमांच्या यशाचा समावेश आहे. देशभर राबविल्या जाणाऱ्या शिक्षणविषयक धोरणांचा व प्रकल्प यांचा पडलेला प्रभाव व साध्य झालेले ध्येय अधोरेखित करते. भारतीय शिक्षण पद्धतीत येऊ घातलेली आव्हाने व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने सदुपदेशनाची गरज यात मांडलेली आहे.

*दुसरे प्रकरण* सदुपदेशनाची संकल्पना स्पष्ट करते. सदुपदेशनाचा कार्यक्रम ज्या तत्त्वावर आधारित आहे ती तत्त्वे अधोरेखित केली गेली आहेत. सदुपदेशनबाबत असलेल्या गैरसमजुती ही नमूद केल्या आहेत.

*तिसऱ्या प्रकरणात* सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियानाची गरज अधोरेखित केली आहे . सदुपदेशन प्रक्रियेतील तीन महत्त्वाचे घटक -सदुपदेशक, सदुपदेशग्रही व व्यवस्थापन यांची ओळख करून त्यांच्यामधील परस्परसंवाद याबद्दल भाष्य करते. या अभियानाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पुढील टप्पे कोणते असतील हेही या प्रकरणात सुचविले आहे.

*प्रकरण चार* मध्ये सदुपदेशक, सदुपदेशकाची वैशिष्ट्ये व सदुपदेशग्रही याबद्दलच्या विविध पैलूनवर प्रकाश टाकते. सदुपदेशकाची कौशल्ये, सदुपदेशनाचे प्रकार व सदुपदेशकाचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास यावर सुद्धा हे प्रकरण भर देते. या प्रकरणात सदुपदेशनाची महत्त्वाची क्षेत्रेही अधोरेखित करण्यात आली आहेत.

*प्रकरण पाच* मध्ये कार्यक्रमाचा आराखडा, कार्यक्रमाचे व्यवस्थापन, लाभार्थी यांची भूमिका व जबाबदऱ्या, सदुपदेशन कार्यक्रमाच्या विविध पायऱ्या, कार्यक्रमाचे मूल्यमापन व शाळा आणि संस्थांवर कार्यक्रमाचा होणारा परिणाम याबद्दल माहिती आहे . हे कार्यक्रमाचे संस्थात्मकीकरण आणि प्रोत्साहन देखील अधोरेखित करते.

*प्रकरण सहा* मध्ये राष्ट्रीय सदुपदेशन भौतिक सुविधा (National Mentoring Infrastructure-NMI) ची स्थापना, त्याची रचना तत्त्वे आणि तंत्रज्ञान या घटकांवर प्रकाश टाकते; यात एकात्मिक सदुपदेशन इंटरफेस (Unified Mentoring Interface-UMI) चा देखील उल्लेख आहे.

*सातवे प्रकरण* राष्ट्रीय सदुपदेशन अभियानाच्या प्रवासाकडे आणि पुढील मार्गाकडे लक्ष वेधते.

प्रकरण
१

# भारतातील शिक्षण




# प्रकरण १: भारतातील शिक्षण

## १.१ भारतातील शिक्षण: सद्यस्थिती

प्रगतीसाठी आवश्यक असणारे परिणाम प्राप्त करण्यासाठी खूप विचारपूर्वक निवडलेली तत्त्वे शैक्षणिक उपक्रमाना दिशा दाखवतात. भूतकाळात अनेक नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत आणि अंमलबजावणीची जटिलता लक्षात न घेता त्यांनी सकारात्मक बदल घडवून आणण्यात महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. प्राथमिक स्तराचा मजबूत पाया सुनिश्चित करताना, शिक्षणाच्या सर्वत्रिकीकरणावर लक्ष केंद्रित केले गेले आहे. बालकांच्या वाढीसाठी व सुसमायोजित, आत्मविश्वासपूर्ण प्रौढ व्यक्तिमध्ये रूपांतर करण्यासाठी मुलांसाठी अनुकूल अशा वातावरणाची आखणी करणे गरजेचे आहे. शिक्षक एक सुविधा देणारे आणि सहयोगी वातावरण निर्माण करणारे ठरून विद्यार्थ्यांना त्यांची प्रगती मोजण्यात मदत करण्यास सहाय्यभूत ठरतात.

शिक्षकांची भूमिका ही एक अत्यावश्यक घटक म्हणून उदयास आली आहे, जी आजूबाजूच्या शिक्षण व्यवस्थेचे चित्र बदलू शकते आणि गुणवत्ता, संधी  आणि समानता यांचा समतोल साधण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार करू शकते. UDISE च्या तात्पुरत्या आकडेवारीनुसार, भारताच्या शाळांमध्ये अंदाजे ९५ लाख शिक्षक आहेत ज्यात कायम, कंत्राटी आणि पॅरा शिक्षक (शिक्षक मित्र आणि नियोजन शिक्षक) यांचा समावेश आहे. शिक्षकांची क्षमता आणि चारित्र्य हे शिक्षणाचा दर्जा आणि राष्ट्रीय विकासात त्याचे योगदान निश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. एन.ई.पी २०२० ने शिक्षकांच्या सतत व्यावसायिक विकासावर आणि प्रशिक्षणावर भर दिला आहे. यामध्ये शिक्षक शिक्षण कार्यक्रमांच्या विविध पैलूंचे मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षक शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचा (National Curriculum Framework for Teacher Education NCFTE) मसुदा तयार करणे समाविष्ट आहे. 'शिक्षक सक्षमीकरणाचे संस्कार' याला देखील योग्य महत्त्व दिले जाईल, ज्यात मूलत: शिक्षकांना शाळेची उद्दिष्टे आणि धोरणे ठरवण्यात सहभागी होण्याचा आणि काय आणि कसे शिकवायचे यावरील त्यांच्या व्यावसायिक निर्णयाचा वापर करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.




आकृती १.१: भारतातील शिक्षण

संयुक्त राष्ट्रसंघाचे एन.ई.पी २०२० आणि एस.डी.जी ४ (SDG- Sustainable Development Goal) यामध्ये सार्वत्रिक दर्जेदार शिक्षण आणि आजीवन शिक्षणाची उद्दिष्टे सामायिक आहेत. पुढे, एस.डी.जी ४ स्वस्त आणि दर्जेदार शिक्षणात प्रवेश सुधारणे, शिक्षणातील भेदभाव दूर करणे आणि मूलभूत साक्षरता आणि संख्यात्मकता प्राप्त करणे यावर लक्ष केंद्रित करते. भारत सरकारच्या प्रमुख योजना - समग्र शिक्षा आणि निपुण भारत यांचे सर्व विद्यार्थ्यांसाठी सार्वत्रिक दर्जेदार शिक्षण मिळवण्याचे उद्दिष्ट आहे. पोषण आहार सहाय्य, उच्च शिक्षण आणि शिक्षक शिक्षणावरील लक्ष्यित योजना या प्रयत्नांना पूरक आहेत. पायाभूत सुविधांच्या स्तरावरील अडथळे दूर करण्यासाठी डिजिटल शिक्षण, पायाभूत सुविधा आणि क्षमता निर्माण करण्यासाठी संस्थांची स्थापना करण्यासाठी संसाधने उपलब्ध करून दिली जात आहेत.

कोरोना महामारी दरम्यान अध्यापन ऑनलाइन करणे अनिवार्य बनले व शाळा बंद असताना ही डिजिटल साधने शिक्षणासाठी जीवनरेखा बनली. डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे प्रदान केलेली क्षमता महामारीच्या काळात तात्पुरता उपाय म्हणून काम करण्यापलीकडे गेली. यामुळे लोक काय, कसे, केव्हा आणि कोठे शिकतात याची त्यांची समज विकसित करण्यासाठी शिक्षक, नेते आणि समाज सक्षम झाला. शिक्षक केवळ ज्ञान देणारा न राहता, ज्ञानाचा सह-निर्माता, मार्गदर्शक, सदुपदेशक आणि मूल्यमापनकर्ता म्हणून शिक्षकांची भूमिका उदयास आली.

## १.२ शिक्षकांची भूमिका

विद्यार्थी केंद्रस्थानी असल्याने, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याची जबाबदारी सामान्यतः शिक्षकांवर असते. त्यांच्या भौगोलिक परिस्थितीतील शाळा व त्या शाळांची संस्कृति ठरविण्यामध्ये सुद्धा ते महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांना कोणत्याही आव्हानाला प्रतिक्रिया देण्याऐवजी सक्रिय धोरणात्मक प्रतिसाद देण्याकडे लक्ष केंद्रित करावे लागत आहे. विधायक बदल सुलभ करणे आणि तो बदल घडवून आणल्यामुळे होणारे बदल प्रभावीपणे व्यवस्थापित करणे ही सर्वसामान्यपणे व्यक्त केलेली अपेक्षा आहे. शाळेतील रचना, धोरणे, मंडळे किंवा शाळेत राबविल्या जाणाऱ्या पद्धती यांनुसार शिक्षक अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.




आकृती १.२: शिक्षकाची भूमिका

भूतकाळातील आव्हानांचे अनुभव सतत शिकण्याची आणि कौशल्य निर्माण करण्याची गरज अधोरेखित करतात. भूतकाळात अनेक उपक्रम सुरू करण्यात आले आहेत ज्यात क्षमता वाढवणे आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासावर सतत लक्ष केंद्रित केले गेले आहे. सतत शिक्षण आणि विकासाची व्याप्ती सक्षम करणाऱ्या या बहुविध संरचना असूनही, अजूनही काही आव्हाने आहेत ज्यांना आमचे शिक्षक तोंड देत आहेत, ज्याचा विकेंद्रित आणि संदर्भित क्षमता निर्माण करण्यासाठी अडथळा निर्माण होतो.

## १.३. जटिल आणि उदयोन्मुख आव्हाने

शिक्षकांसाठी शिकण्याच्या संधी या कालावधीत उद्भवलेल्या आवश्यकतांनुसार तयार आणि विहित केल्या आहेत. तथापि, फार कमी वेळा त्यांना त्यांच्या व्यावसायिक विकासाचा भाग म्हणून चर्चा, सत्रे किंवा शिक्षण मंडळे निवडण्याची संधी मिळते. परंतु समाजात असलेली नैपुण्यता कोठारात बंदिस्त आहे ज्यामुळे त्याचा सर्वोत्तम मार्गाने फायदा घेणे कठीण झाले आहे.

ज्या शिक्षकांना शिकण्यात रस आहे, ते वेगवेगळ्या आणि वैविध्यपूर्ण संदर्भांतील आहेत. त्यामुळे, समान अडचणींचा सामना करणाऱ्यांसाठीही, समस्या सोडवण्यासाठी एकत्र काम करणे, चर्चा करणे आणि त्यांचे कौशल्य विकसित करणे कठीण झाले आहे. कठीण, नवीन आणि सतत विकसित होणाऱ्या समस्या हाताळण्याचा प्रयत्न करताना एखाद्याला एकटेपणा आणि निरुत्साह वाटतो, ज्यामुळे शेवटी परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होते. साथीच्या रोगामुळे एका अशा समाजाचे महत्त्व निर्माण झाले आहे जो सर्वांना सामोरे जावे लागणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय, अध्ययन, अनुभव सातत्याने इतरांबरोबर सामायिक करतो. काही वेळा, शिक्षकांना त्यांच्यासमोर येणाऱ्या आव्हानांसाठी उपाय शोधण्यात उशीर होतो. हा उशीर होण्याचे मुख्य कारण शिक्षकांना प्लॅटफॉर्म, तंत्रज्ञान किंवा विशिष्ट सहाय्य पुरविण्यास सक्षम असलेल्या तज्ञांशी संपर्क कसा करावा याबद्दल माहिती नसते.

शिक्षक त्यांच्या भूमिकांचा भाग म्हणून अनेक जबाबदाऱ्या स्वीकारतात. विशेषत: जेव्हा त्यांची शारीरिक उपस्थिती आवश्यक असते अशा वेळी स्वतःच्या क्षमता आणि व्यावसायिक विकासासाठी वेळ व्यवस्थापित करणे आणि त्यांच्या भूमिकांसाठी आवश्यक असलेल्या कार्यांमध्ये संतुलन साधणे  अत्यंत आव्हानात्मक होते.

## १.४. समर्पकता आणि संदर्भ

विविध भौगोलिक परिस्थितीतील, विविध भूमिका बजावणारे आणि विविध क्षेत्रातील शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाच्या गरजा, संदर्भ, आणि आव्हाने आवडीनुसार बदलू शकतात म्हणून, प्रत्येक शिक्षक त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी उद्बोधन (अभिमुखता) आणि नेटवर्किंगची भिन्न पद्धत शोधू शकतो. काही शिक्षक समवयस्कांकडून थेट शिकण्यास प्राधान्य देतात तर काही समान आव्हानांना तोंड देत असलेल्या मोठ्या समुदायाशी जोडून घेतात. काही परिस्थितींमध्ये, तज्ञांचे मत त्यांना उपाय शोधण्यास सक्षम करते. म्हणून, त्यासाठी एक व्यासपीठ आवश्यक आहे, जिथे शिक्षकांना व्यावसायिक सहाय्य (समर्थन) मिळू शकेल.

## १.५. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) सदुपदेशनसाठी दृष्टी

दर्जेदार शिक्षणाच्या एस.डी.जी ४ च्या संरेखनातील शैक्षणिक संरचने प्रमाणे एन.ई.पी २०२० मध्ये शिक्षणाच्या सर्व पैलूंमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे.[1] हे परिणामांची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध स्तरांवर उपाय म्हणून सदुपदेशन प्रस्तावित करते.

### १.५.१ विद्यार्थ्यांसाठी

शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि सर्वांसाठी शिक्षणाची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या प्रयत्नात, शालेय विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी आणि समुदाय सदस्यांकडून सदुपदेशन केले जाईल, ज्यामुळे वाढीव शैक्षणिक परिणाम आणि शाश्वत रूची निर्माण होईल.

### १.५.२ शिक्षकांसाठी

एन.ई.पी २०२० ने शिक्षक तयार करण्याच्या प्रक्रियेला "बहुविद्याशाखीय दृष्टीकोन आणि ज्ञान, स्वभाव आणि मूल्यांची निर्मिती आणि सर्वोत्तम सदुपदेशकांच्या सल्ल्याने सराव करणे "[2] आवश्यक म्हणून ओळखले आहे. म्हणून, सर्व मंडळामध्ये शिक्षकांच्या विकासासाठी सहायक म्हणून सदुपदेशन प्रस्तावित करते.

अ. शालेय शिक्षण विभागाच्या क्लस्टर रिसोर्स सेंटर्सद्वारे अंगणवाड्या/बालवाटिकांमध्ये ई.सी.सी.ई (ECCE-Early Childhood Care and Education) शिक्षकांसाठी सतत मूल्यांकनासाठी मासिक बैठकांसह एक मार्गदर्शन संरचना स्थापन करण्याचे सुचवते. दूरगामी दृष्टीकोनातून, व्यावसायिकदृष्ट्या पात्र ई.सी.सी.ई शिक्षक तयार करण्याच्या दीर्घकालीन प्रस्तावामध्ये, व्यावसायिक प्रशिक्षण, सदुपदेशन यंत्रणा आणि करिअर मॅपिंग यांचे संयोजन वापर केला जाईल.

ब. सेवांतर्गत प्रशिक्षण शिक्षकांसाठी, व्यावहारिक प्रशिक्षणाव्यतिरिक्त आणि त्यांची पात्रता वाढवण्याच्या उद्देशाने सेवारत शिक्षकांसाठी एक योग्य, मजबूत सदुपदेशन व्यवस्था तयार केली जाईल.

स. उत्कृष्ट व्यावसायिकांच्या समूहाद्वारे शिक्षकांना दीर्घकालीन व्यावसायिक सहाय्य प्रदान करण्याच्या उद्देशाने सदुपदेशनासाठी राष्ट्रीय अभियानाची स्थापना केली जाईल.

### १.५.३ शाळा प्रमुखांसाठी

अध्यापन-अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्यासाठी, सतत गुणवत्ता सुधारण्यासाठी मापदंड स्थापित करण्यासाठी, शिक्षकांच्या विकासासाठी शाश्वत समर्थन प्रदान करण्यासाठी आणि एक सहयोगी शिक्षण संस्था तयार करण्यासाठी, शैक्षणिक नेत्यांच्या क्षमता वाढीसाठी शैक्षणिक प्रमुख म्हणून सदुपदेशन संरचना सुचवते.

[1] Ministry of Human Resource Development. (2020, July 29). National Education Policy 2020. Government of India.
[2] Ministry of Human Resource Development. (2020, July 29). National Education Policy 2020. Government of India.

### १.५.४ शैक्षणिक नेते आणि संस्थांसाठी

शैक्षणिक नेतृत्वाचा समावेश करून शैक्षणिक संस्थांमध्ये सदुपदेशन करण्याच्या गरजेवर एन.ई.पी २०२० भर देते. उच्च शिक्षण संस्थांसाठी एन.ई.पी २०२० चा प्राथमिक लक्ष्य, प्रभावी प्रशासन आणि उत्तम नेतृत्वासाठी सदुपदेशनाद्वारे त्यांची पुनर्रचना आणि एकत्रीकरण होते.

अ. उच्च शिक्षण संस्थांमध्ये सक्षमीकरण आणि स्वायत्त नवोपक्रमाच्या संस्कृतीला चालना देण्यासाठी, एक श्रेणीबद्ध मान्यता प्रदान करणारी यंत्रणा स्थापन केली जाईल, ज्यासाठी महाविद्यालयांना ठराविक टप्प्यांनुसार (बेंचमार्कच्या) वरील स्तरावर जाण्यासाठी सदुपदेशन केले जाईल. प्रत्येक विद्यापीठ त्यांच्या संलग्न महाविद्यालयांना "शैक्षणिक आणि अभ्यासक्रमाच्या बाबी, अध्यापन आणि मूल्यांकन यांमध्ये क्षमता विकसित करण्यात मदत करण्यासाठी सदुपदेशन करेल ज्यायोगे प्रशासन सुधारणा; आर्थिक मजबूती; आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढेल," अखेरीस स्वायत्त पदवी-अनुदान महाविद्यालयांमध्ये संक्रमण केले जाईल.

ब. याव्यतिरिक्त, एन.आर.एफ (NRF-National Research Foundation) च्या प्राथमिक भूमिकांपैकी एक म्हणजे सर्व क्षेत्रातील दर्जेदार शैक्षणिक संशोधन उत्प्रेरित करण्यासाठी शैक्षणिक संस्थांचे सदुपदेशन करणे.

एन.ई.पी २०२० ने केलेल्या शिफारशींव्यतिरिक्त, भारतातील सर्व शैक्षणिक परिसंस्थेमध्ये विविध उद्देशांसाठी सदुपदेशन संरचना स्थापन करण्यास भरपूर वाव आहे. विविध लाभार्थी व्यक्ती मध्ये असलेल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग शैक्षणिक परिसंस्थेच्या संवर्गांमध्ये प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने माहिती आणि मार्गदर्शन प्रसारित करण्यासाठी केला जाऊ शकतो.

# प्रकरण २ सदुपदेशनाचा परिचय



# प्रकरण २: सदुपदेशनाचा परिचय

## २.१. सदुपदेशनाची संकल्पना

सदुपदेशन - या शब्दाचा वापर एखाद्या कामाचा प्रगाढ अनुभव असलेली व्यक्ती व त्या व्यक्तीच्या अनुभवातून शिकण्याची इच्छा असणारा यांच्यातील परस्परसंवादचे वर्णन करण्यासाठी बऱ्याच पूर्वीपासून केला गेला आहे. सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही या दोघांसाठी वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रगती साधण्याचा हा एक उत्तम मार्ग असल्याचे मानले जाते.[3] या परस्परसंवादांमध्ये सदुपदेशग्रहीच्या प्रश्नांना प्रतिसाद देणे, सहाय्य प्रदान करणे, सखोल समुपदेशन करणे, जटिल आणि आव्हानात्मक समस्या सोडवणे इत्यादींचा समावेश असू शकतो. सदुपदेशन संबंध हे प्रदीर्घ, संरचित सहजीवन संबंध आहेत, जे समान क्षेत्रातील व्यावसायिकांमधील सानुकूलित परस्पर संवादावर आधारित आहेत. ते प्रामुख्याने सदुपदेशनग्रहीच्या ध्येयाच्या दिशेने त्याचा व्यावसायिक विकास घडवून आणतात.

**<u>सदुपदेशक- सदुपदेशग्रहीच्या नात्यासंबंधी कथा</u>**

सदुपदेशनाची मुळे जगभरातील प्राचीन इतिहासात आहेत. सदुपदेशक (Mentor ) या मूळ इंग्रजी शब्दाचा पहिला उल्लेख केलेला पुरावा ग्रीक मजकुरात आढळतो. महाभारतात, श्रीकृष्णाने अर्जुनाला धर्माच्या मार्गावर जाण्यासाठी आणि युद्धभूमीवर आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी सदुपदेशन केले. बौद्ध धर्मातील कमल सूत्र "लोकांच्या आनंदासाठी आणि त्यांना दु:खापासून मुक्त करण्यासाठी एकत्र काम करण्याची सामायिक प्रतिज्ञा" सह सदुपदेशक-सदुपदेशग्रही (मेंटर-मेंटी) संबंधांना मूलभूत मानते.[4]

चर्चेद्वारे गंभीर विचारांना चालना देण्याच्या सॉक्रेटिक पद्धतीप्रमाणे, सदुपदेशन हे व्यक्तींमधील सामायिक संवाद म्हणून सादर केले गेले आहे, ज्यापैकी एक विचार करायला लावणारे प्रश्न मांडतो आणि दुसरा स्वतःचे प्रश्न विचारून गुंततो. गुरुकुल पद्धतीद्वारे भारतीय इतिहासातील शिक्षणामध्ये सदुपदेशनानेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सदुपदेशक हा गुरू होता आणि सदुपदेशग्रही हा शिष्य होता. या प्रणालीद्वारे सदुपदेशग्रहीला त्याच्या क्षमता जाणून घेण्याच्या जवळ जाण्यास मदत करण्यासाठी प्रेरणा आणि प्रेरणेद्वारे मार्गदर्शन केले जात असे.[5] पाटलीपुत्राचा राजा आणि त्यानंतर एक महान सम्राट होण्यासाठी चाणक्याने चंद्रगुप्त मौर्याला दिलेले सदुपदेशन विविध साहित्यिक संदर्भांमध्ये नमूद केले आहे.

प्राचीन इतिहासापासून पुढे जाताना, अरिस्टॉटलकडून अलेक्झांडर द ग्रेटचे सदुपदेशन तसेच डॉ. बेंजामिन एलिजा मेसपर्यंत ज्यानी मार्टिन ल्यूथर किंग यांचे सदुपदेशन केले. अशा आधुनिक इतिहासातीलसुद्धा सर्व यशस्वी सार्वजनिक व्यक्तींनी त्यांच्या जीवनात सदुपदेशकांची प्रमुख भूमिका बजावली आहे. शिक्षण आणि कौशल्य-विकसनासाठी सदुपदेशन ही एक महत्त्वाची आणि प्रभावी पद्धत म्हणून आता पुन्हा उदयास येऊ लागली आहे.[6]

---

[3] Together Platform. “Mentor Handbook.” Together Platform.
[4] Soka Gakkai. (2020). The Oneness of Mentor and Disciple. Soka Gakkai (Global).
[5] Kukreja, S., Arora, R., & Singh, T. (2020). Mentorship Program: Modern Outlook of Traditional Knowledge. International Journal of Applied & Basic Medical Research.
[6] Hansman, C. A. (2002). Critical Perspectives on Mentoring. Center on Education and Training for Employment, College of Education, The Ohio State University.

सदुपदेशनाचा ढोबळ मनाने केलेला अर्थ जरी वैयक्तिक आणि व्यावसायिक गरजा पूर्ण करण्याच्या संदर्भात असला तरी *"लोकांना त्यांचे शिक्षण व्यवस्थापित करण्यासाठी सहाय्य देणे आणि प्रोत्साहित करणे, जेणेकरून ते त्यांची क्षमता वाढवू शकतील, कौशल्ये विकसित करू शकतील, त्यांची क्षमता सुधारू शकतील अशी व्याख्या केली गेली आहे. त्यायोगे त्यांना त्यांची कामगिरी सुधारता येते आणि त्यांना हवी असलेली व्यक्ती बनता येते."*[7]

## २.२ सदुपदेशनाची तत्त्वे

संवादादरम्यान सहभागींच्या गरजेनुसार सदुपदेशन विविध प्रकारचे असू शकते, परंतु काही मार्गदर्शक तत्त्वे सदुपदेशनाच्या संरचनेचे सार राखण्यासाठी मदत करू शकतात. सदुपदेशन सर्वात जास्त यशस्वी होईल जेव्हा सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही दोघेही या प्रक्रियेत गुंतलेले असतात. हे लक्षात ठेवून की ते सदुपदेशन संरचनेतील सहभागींना आवश्यक असलेल्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देतील, नॉल्स[8] यांनी सांगितलेल्या प्रौढ-शिक्षण तत्त्वांशी सुसंगत राहण्यासाठी पुढील तत्वाची यादी तयार केली गेली आहे, लक्षात ठेवून की ते सदुपदेशन संरचनेतील सहभागींना आवश्यक असलेल्या गुंतवणुकीला प्रोत्साहन देतील.

अ. सदुपदेशग्रही-दिग्दर्शित : सदुपदेशग्रहीनी त्यांच्या शिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी तसेच मूल्यमापन प्रक्रियेत सहभागी असले पाहिजे. सदुपदेशग्रहीने संबंध वाढवले पाहिजे आणि त्यांच्या विकासासाठी वाढती जबाबदारी घेण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. सदुपदेशकाचे मत किंवा बळजबरी हे सदुपदेशन परस्परसंवादाचे प्रेरणा स्रोत नसावे. सदुपदेशग्रहीला त्याची स्वतःची ध्येये निश्चित करण्यासाठी, आव्हाने ओळखण्यासाठी आणि सदुपदेशग्रहीच्या गरजेनुसार प्राधान्य देण्यासाठी सदुपदेशकाने मार्गदर्शन केले पाहिजे.

ब. व्युत्पन्न : सदुपदेशग्रहीच्या जीवनातील अनुभवांचा सदुपदेशन प्रक्रियेदरम्यान विचार केला पाहिजे. सदुपदेशग्रहीना त्यांच्या अनुभवांवर विचार करण्यास सक्षम केले पाहिजे.

स. उपयोजनावर आधारित : सदुपदेशनाच्या प्रक्रियेतून वास्तविक जीवनातील समस्या आणि/किंवा प्रक्रियांमधील अंतर्दृष्टी प्राप्त करण्यास मदत केली पाहिजे.

ड. सहाय्यभूत : स्वसहाय्य , व्युत्पत्ती व उपयोजनवर आधारित असा अनुभव प्राप्त करण्यासाठी ज्या परिस्थिति आवश्यक आहेत अशा परिस्थितीची व सहाय्याची निर्मिती करणे हा सदुपदेशकाचा हेतु असावयास हवा.

ई. सुरक्षित: सर्व सहभागींसाठी मार्गदर्शनाचा अनुभव ऐच्छिक असला पाहिजे, सुरक्षितता प्रदान करण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत. या संरचनेत विश्वास, गोपनीयता, परस्पर आदर आणि संवेदनशीलता प्रस्थापित केली पाहिजे. सदुपदेशक व सदुपदेशग्रही यांनी त्यांच्यातील

[7] Parsloe, E., & Leedham, M. (2009). Coaching and mentoring: Practical conversations to improve learning. Kogan Page Publishers.

[8] Knowles, M. S. (1980). The modern practice of adult education: From pedagogy to andragogy. Englewood Cliffs, NJ: Cambridge Adult Education.

मतभेद दूर सारताना काही चौकटींचा व नियमांचा स्वीकार केला पाहिजे.

फ. सहजीवन : सदुपदेशन करण्याच्या प्रक्रियेत सदुपदेशग्रही आणि सदुपदेशक या दोघांच्या सतत विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा ते सल्ला आणि/किंवा त्यांचे मार्गदर्शन संवाद पुढे नेण्यासाठी मदत घेऊ शकतात. सदुपदेशनाच्या प्रक्रियेतून त्याना लाभच होईल असे स्वीकारूनच सदुपदेशकाला फायदा होईल.

## २.३. सदुपदेशनाशी संबंधित सामान्य गैरसमज

सदुपदेशनाशी संबंधित सामान्य गैरसमजुती पुढील प्रमाणे आहेत:

अ. **सदुपदेशन नातेसंबंधाचा फायदा फक्त सदुपदेशग्रहीना होतो.** सदुपदेशन ही एक सहजीवन व्यवस्था आहे ज्यामध्ये सदुपदेशग्रहीला अधिक स्पष्ट फायदे असूनही सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही दोघेही एकमेकांकडून शिकतात.

ब. **सदुपदेशन नातेसंबंध वैयक्तिकरित्या असणे आवश्यक आहे.** सदुपदेशनासाठी प्रत्यक्ष संवादाचे स्वतःचे फायदे आहेत, तथापि सदुपदेशन संबंध प्रस्थापित करण्यासाठी, असिंक्रोनस आणि ऑनलाइन पद्धतीदेखील वापरल्या जाऊ शकतात.

स. **सदुपदेशग्रहीला एका वेळी फक्त एक सदुपदेशक असू शकतो.** भिन्न सदुपदेशक त्यांचे विशेष ज्ञान आणि कौशल्ये एका सदुपदेशनात वापरू शकतात आणि यामुळे एखाद्या व्यक्तीच्या व्यावसायिक अनुभवामध्ये लक्षणीय सुधारणा होऊ शकते.


ड. **आवश्यकतेनुसार सदुपदेशन नातेसंबंधात प्रवेश केला जाऊ शकत नाही.** सदुपदेशन करणारे नाते नैसर्गिकरित्या विकसित होते आणि जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्यात प्रवेश केला जाऊ शकतो. संरचित सदुपदेशन संबंधात पूर्वनिर्धारित वारंवारता आणि शेवटी पूर्ण करायच्या उद्दिष्टांची सूची समाविष्ट असू शकते.

ई. **सदुपदेशक हे सदुपदेशनग्रहीपेक्षा मोठे असावेत.** सदुपदेशक निवडण्याचा आदर्श मार्ग म्हणजे त्यांचे कौशल्य, क्षमता, अधिकारपत्रे आणि एकत्र शिकण्याची मानसिकता यावर आधारित त्यांचे मूल्यांकन करणे.

फ. **कोणीही व्यक्ती एक तर सदुपदेशक किंवा सदुपदेशनग्रही असू शकते.** स्वतःहून फलदायी सदुपदेशन संबंध निर्माण करण्यासाठी व आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी, सदुपदेशकांना त्यांचे स्वतःचे सदुपदेशक असणे आवश्यक असते. स्वतःच्या व्यावसायिक विकासासाठी सदुपदेशकांचे स्वतःचे सदुपदेशक बऱ्याचदा असतात.

# प्रकरण ३

# राष्ट्रीय सदुपदेशन अभियानाची ओळख



# प्रकरण ३ राष्ट्रीय सदुपदेशन अभियानाची ओळख

राष्ट्रीय सदुपदेशन अभियान व्यावसायिक विकासासाठी आणि जलद प्रगतीसाठी काम करेल व विद्यमान संसाधनांचा फायदा घेऊन भारतीय शिक्षण प्रणालीचा जलद विकास सुलभ करेल. या अनुषंगाने, एन.सी.टी.ई ने शालेय शिक्षकांसाठी ज्ञान, कौशल्ये आणि मूल्यांचे संपादन आणि देवाणघेवाण सुधारण्यासाठी सदुपदेशनासाठी राष्ट्रव्यापी अभियानाचा प्रस्ताव दिला आहे.

## ३.१ राष्ट्रीय सदुपदेशन अभियानाची गरज


आजच्या अभूतपूर्व मागण्या आणि आव्हानांमध्ये, शिक्षकांना नवीन उपाययोजनांची आवश्यकता आहे. ज्यांच्याकडे समस्या सोडवण्यासाठी आणि समवयस्कांच्या क्षमता वाढीसाठी योगदान देण्याचे ज्ञान आणि कौशल्ये आहेत अशा तज्ञांनी शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचा समुदाय स्वतःच समृद्ध आहे. सतत बदलणाऱ्या वातावरणाशी जुळवून घेण्यास सक्षम असलेल्या प्रणाली, त्यांच्या नागरिकांना वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी कौशल्यांचे योग्य मिश्रण प्रदान करू शकतात. यामुळे सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वृद्धी होते. म्हणून, सदुपदेशन प्रणाली अधिक विकेंद्रित पद्धतीने सध्या असलेली तफावत दूर करण्यासाठी उपाय प्रदान करते. या तफावती कौशल्य मिळवणे, सतत व्यावसायिक विकास करणे, समान संदर्भातील समवयस्कांशी संपर्क साधणे आणि अध्ययनाची देवाण घेवाण करण्यासाठी व्यासपीठ नसणे यामधील आहेत. सदुपदेशन व्यक्तींना, अनुभवी व्यावसायिकासोबत अध्ययन करण्याची संधी देते. सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही यांच्यातील परस्परसंवादाचे वेगवेगळे मार्ग शिक्षकांसाठी कौशल्य आणि क्षमता निर्माण करण्यास सक्षम करू शकतात. शाळेतील नेतृत्त्व, व्यवस्थापन, अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र, शैक्षणिक धोरणे, आणि मूल्यमापन यासंदर्भातील अध्ययन अनुभव, उत्कृष्ट उपक्रम इत्यादींची देवाण घेवाण करण्यासाठी व तज्ञ व्यक्तींशी सहासंबंध निर्माण करण्यासाठी याचा उपयोग होतो.

सध्याच्या शिक्षण प्रणालीमध्ये, माहिती आणि शिक्षणाचा श्रेणीबद्ध, एकदिशात्मक, वरपासून खालचा प्रवाह, अनेकदा प्रशिक्षण कार्यक्रम म्हणून तयार केलेला असतो, ही एक प्रचलित समस्या आहेत. सदुपदेशनाला पदानुक्रमाच्या सीमा पुसट करण्याची आणि मूलभूत प्रतिमानात बदल घडवून आणण्याची संधी असते. सदुपदेशन अध्ययन प्रक्रिया जास्त व्यक्तिगत व सातत्यपूर्ण बनवेल.

***सदुपदेशनामुळे लाभार्थी साठी एक सहयोगी संस्था तयार होते जिथे समुदाय क्षमता वाढीसाठी, शिकण्याची, मनन करण्याची आणि इतरांबरोबर वाटून घेण्याची भावना वाढवते.***

## ३.२ अभियान कसे साध्य केले जाईल?

एक समान ध्येय साध्य करण्यासाठी अनेक व्यक्ती संवाद साधतात असे या अभियानाचे वर्णन केले जाऊ शकते. त्याची अंमलबजावणी शिक्षण क्षेत्रातील सर्व स्तरांवर होऊ शकते.





आकृती ३.१: परस्परसंवादात गुंतलेले आणि एक गट म्हणून ध्येयाकडे प्रगती करणारे कलाकार

### कलाकार (कार्यकर्ते)

सदुपदेशनाच्या या अभियानात मुख्य भूमिका पार पाडणारे सदुपदेशक व सदुपदेशग्रही हे आहेत. सदुपदेशग्रही या शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती आहेत, ज्या त्यांच्या क्षेत्रात व्यावसायिक विकास शोधत आहेत. सदुपदेशक हे त्यांचे समकक्ष किंवा त्यावरील व्यक्ती आहेत, ज्या काही काळापासून त्याच क्षेत्रात व्यावसायिक विकास करीत आहेत आणि "विकास साधण्यासाठी " अनुकूल चर्चा आणि संभाषण सुलभ करण्यात पारंगत आहेत.


जरी सदुपदेशक व सदुपदेशग्रही यांची भूमिका काही -प्रमाणात सदुपदेशन क्रियाकलाप आयोजित करण्यासाठी पुरेशी असू शकते, या मिशनमध्ये मोठ्या प्रमाणावर सदुपदेशनाची संरचना सुलभ करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी तिसरा घटक समाविष्ट आहे. प्रशासक (वैयक्तिक किंवा संस्था) सदुपदेशक व सदुपदेशग्रही यांच्यात होणाऱ्या सर्व संवादांची गुणवत्ता आणि वारंवारता सुधारण्यासाठी जबाबदार असतात. याव्यतिरिक्त, ते सदुपदेशन संरचनेचा सतत विकास आणि व्यवस्थेद्वारे (इकोसिस्टमद्वारे) त्याचे संस्थात्मकीकरण सुनिश्चित करतात. शैक्षणिक व्यवस्थे मधील (इकोसिस्टममधील) कोणत्याही सदुपदेशन कार्यक्रमाचे प्रमाण मोठे असण्याची शक्यता असल्याने, इतर प्रणाली (सिस्टीम) भागीदारांना तंत्रज्ञान आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्म विकसित करण्याची सर्व कलाकारांसाठी मार्गदर्शनाचा अखंड अनुभव देण्याची भरपूर संधी आहे.




**आकृती ३.२: सदुपदेशन करणारे कलाकार**

या कलाकारांमधील परस्परसंवाद प्रामुख्याने ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि उत्कृष्ट उपक्रम यांच्या देवाणघेवाणीवर केंद्रित असतील. उदाहरणार्थ, नवीन शिक्षकांच्या उद्बोधनासाठी उत्कृष्ट उपक्रमाबद्दल चर्चा सुलभ करण्यासाठी, सदुपदेशग्रही गटाशी सदुपदेशक संभाषण करतो. संरचनेचा प्रशासक, व्यक्ती-आधारित चर्चा कशी सुलभ करावी यावरील कौशल्य-निर्मिती सत्रात सदुपदेशकाला गुंतवून ठेवतो.

परस्परसंवादाचा प्रभावीपणा चार घटकांद्वारे दर्शविला जातो. ते चार घटक म्हणजे- आश्वासन, एकमत, संरचना आणि साधने.





**आकृती ३.३: लाभार्थीमधील (भागधारकांमधील) परस्परसंवादाची तत्त्वे**

## ३.३ मिशनचे अपेक्षित परिणाम काय आहेत?

संपूर्ण भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये ज्ञान, कौशल्ये आणि मूल्यांचे संपादन आणि हस्तांतरण सुधारण्याचे समान ध्येय साध्य करण्यासाठी कलाकार एकमेकांशी संवाद साधतात. शिक्षण परिसंस्थेतील विविध स्तरांवर मोठ्या प्रमाणात विकेंद्रित व तंत्रज्ञान-सहाय्य सदुपदेशन संरचनांचा समावेश करून हे साध्य केले जाईल.

शिक्षणातील वर्धित व विकेंद्रित नेतृत्वाद्वारे शालेय शिक्षणात सुधारणा करणे हे अंतिम ध्येय आहे. उदाहरणार्थ, शिक्षकांच्या ज्ञानाचा पाया वाढवण्यासाठी, त्यांची कौशल्ये विकसित करण्यासाठी तसेच वर्गातील आव्हानांना तोंड देण्यासाठी, त्यांना अधिक चांगल्या प्रकारे तयार करण्यासाठी, शिक्षकांमध्ये कौशल्य निर्मितीला गती देण्यासाठी सदुपदेशनाचा वापर केला जावा, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे दैनंदिन शिक्षण सुधारेल. शाळांना उत्तम शिक्षण संस्था बनवण्याचा हा एक जलद आणि प्रभावी मार्ग ठरू शकतो. राज्य किवा जिल्हा स्तरावरील संस्थाना / लाभार्थीजनांना सदुपदेशनात भूमिका बजावून विकेन्द्रित पद्धतीने क्षमता विकसनासाठी हे अभियान संधी प्राप्त करून देते. पुढे, या अभियानाचा विस्तार शाळेच्या नेत्यांना आणि शैक्षणिक प्रशासकांना सदुपदेशन करण्यासाठी केला जाऊ शकतो. ही उद्दिष्टे साध्य करणे हा सततचा प्रवास असला तरी मिशनचे काही ठोस टप्पे आहेत जे त्याची प्रगती दर्शवतील.




**आकृती ३.४: मिशनचे प्रमुख टप्पे**

### टप्पा १: तयारी

प्रणालीतील लाभार्थी (भागधारक) व्यावसायिक विकासासाठी गरजांचे मूल्यांकन करू शकतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी व सदुपदेशन कार्यक्रम लागू करण्यासाठी पुरेशा संसाधनांसाठी कृती आराखडा करू शकतात. यावेळी, या व्यवस्थेतील कलाकार मोठ्या प्रमाणातील मार्गदर्शन प्रणालीच्या अंमलबजावणीकडे

लक्ष देण्यासाठी या मार्गदर्शिके (ब्लूबुक) सारख्या संसाधनांचा वापर करू शकतात.

### टप्पा २ : क्षमता निर्माण

एकदा सदुपदेशकाची नियुक्ती झाल्यानंतर, ह्या टप्पावर आवश्यक सदुपदेशन कौशल्ये आणि तंत्रांसह विशिष्ट क्षेत्राशी संबंधित कौशल्यांमध्ये त्यांची क्षमता वाढविण्याची परवानगी दिली जाते.

### टप्पा ३ : ओळख

या टप्प्यात, मार्गदर्शक नियंत्रित वातावरणात स्टेज 2 दरम्यान शिकलेल्या कौशल्यांचा सराव करू शकतात. सदुपदेशन परस्परसंवादादरम्यान प्राप्त केलेल्या गुणवत्तेवर आणि मूल्यावर आधारित सदुपदेशक आणि सदुपदेशग्रहीच्या अभिप्रायाच्या आधारे टप्पा २ मध्ये क्षमता वाढीसाठी वापरल्या जाणाऱ्या कार्यपद्धतीला परिष्कृत करण्यासाठी परिचयाचा टप्पा देखील वापरला जाऊ शकतो.

### टप्पा ४ : मजबूतीकरण

एकदा कलाकार आत्मविश्वासाने नियंत्रित वातावरणात सदुपदेशन संरचना राबवू लागल्यानंतर, सदुपदेशकांना त्यांच्या क्षेत्रातील तज्ञतेमध्ये सदुपदेशन करण्याचा अनुभव मिळू लागतो. हा टप्पा सातत्यपूर्ण क्षमता-बांधणी सत्रांद्वारे सदुपदेशकांच्या सतत विकासाला मदत करतो. यावेळी, सदुपदेशन नातेसंबंधाच्या अंतिम परिणामाकडे येणाऱ्या निकषांचा मागोवा घेणे हे सदुपदेशन संरचनेची परिणामकारकता समजून घेण्यास आणि ठरवलेले निकष साध्य करण्यासाठी पुन्हा जुळवून घेण्यास मदत करेल.

सदुपदेशन कार्यक्रमाचे परिणाम (निष्पत्ति) व ठरविलेली उद्दिष्टये यांच्यात समानता हवी. उदाहरणार्थ, शिक्षकांच्या सहकारी मार्गदर्शन वर्तुळांद्वारे पायाभूत वाचन आणि गणितामधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी सुधारण्यासाठी राबवलेल्या कार्यक्रमात, मूल्यांकनासाठी निवडलेला परिणाम म्हणजे पायाभूत वाचन आणि गणितामधील विद्यार्थ्यांच्या कामगिरीमध्ये टक्केवारी (%) वाढ होय.

### टप्पा ५ : वाढ आणि शाश्वतता

हा टप्पा सदुपदेशन संरचनेची चाचणी करण्यापासून सदुपदेशनाचा सराव करणारा समुदाय तयार करण्याकडे लक्ष वळवतो. व्यवस्थेमधील सर्व संबंधित लाभार्थींचा (भागधारकांचा) सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आणि त्यामध्ये त्यांचे सतत स्वारस्य सुनिश्चित करण्यासाठी, सदुपदेशन संरचना आता वापरली जाऊ शकते. यासाठी पद्धती तयार करून हे साध्य केले जाऊ शकते:

अ. त्याची उपयोगिता सादर करून सहभागाची गरज वाढवणे,

ब. प्रत्येकाचा सहभाग वाढविण्यासाठी संस्थात्मक रचना तयार करणे आणि

स. सुयोग्य प्रोत्साहनांद्वारे, व्यवस्थेमध्ये सतत सहभाग घेण्यासाठी कलाकारांना प्रेरित करणे.

उपरोक्त टप्प्याटप्प्याने या अभियानाचा प्रसार करण्यासाठी, सदुपदेशन प्रणालीमधील सर्व अभिनेत्यांमधील/ कलाकारांमधील परस्परसंवादाचे मूल्य प्रभावीपणे वाढवण्यासाठी पुढील विभाग काही रचनांचे वर्णन करतात.

# प्रकरण ४ सदुपदेशनासाठी उपाय



# प्रकरण ४ : सदुपदेशनासाठी उपाय

## ४.१ सदुपदेशक निवड

सदुपदेशन व्यवस्था तयार करण्यासाठी आणि दीर्घ कालावधीसाठी ही प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी प्रशासका व्यतिरिक्त (व्यक्ती किंवा संस्था) नियुक्त सदुपदेशक आणि सदुपदेश ग्रही आवश्यक असतात. या भागात सदुपदेशकाची निवड प्रक्रिया कशी असू शकते आणि सदुपदेशक आणि सदुपदेशग्रहीच्या गुणधर्मांबद्दलच्या कल्पनांचा समावेश आहे ज्यामुळे सदुपदेशन व्यवस्था यशस्वी होण्यास सक्षम होईल.

### ४.१.१ सदुपदेशक निवड प्रक्रिया

सदुपदेशन प्रक्रियेत सदुपदेशकावर सदुपदेशन व्यवस्थेत सहभागी असलेल्या इतर लभार्थींनी (भागधारकांनी) विश्वास ठेवला पाहिजे. सदुपदेशकाची निवड करण्यासाठी स्वीकारलेली प्रक्रिया सादुपदेशकामध्ये विश्वास निर्माण करण्यात आणि त्यामुळे सदुपदेशनपर संवाद साधण्याच्या मार्गात महत्त्वाची भूमिका बजावते. सदुपदेशक निवड प्रक्रियेत पुढील गोष्टी महत्त्वाच्या आहेत :

अ. समवयस्कांकडून नामांकन आणि/किंवा संभाव्य उमेदवारांनी स्वारस्य व्यक्त करणे

ब. सदुपदेशक निवड निकषांद्वारे उमेदवाराच्या अर्जाचे मूल्यमापन

स. सदुपदेशकांचे उद्बोधन आणि क्षमता निर्माण

समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि विविध क्षेत्रांतील/विषयातील शिक्षणतज्ञांना देखील योग्य सदुपदेशक निवड प्रक्रियेची आखणी करण्यात मदत करण्यासाठी समाविष्ट केले जाऊ शकते. हे प्रणालीच्या गरजानुसार निवड प्रक्रिया ठरविण्यासाठी मदत करू शकते.

सदुपदेशक निवड प्रक्रिया सर्व इच्छुक उमेदवारांसाठी प्रवेशयोग्य असावी. उदाहरणार्थ, असे संभाव्य उमेदवार असू शकतात ज्यांच्याकडे तंत्रज्ञानाची सोय नसेल किंवा त्याना तंत्रज्ञान योग्य प्रकारे हाताळणे जमत नसेल. त्याचप्रमाणे, जर सदुपदेशन संरचना इतर क्षेत्रांमधून जसे की अखिल भारतीय/राज्य सेवा अधिकारी सदुपदेशक निवडू इच्छित असेल तर, त्यांना अर्ज करण्यासाठी निवड प्रक्रिया उपलब्ध असावी. सदुपदेशक निवड प्रक्रिया संभाव्य उमेदवारांना अर्ज करण्यासाठी अडथळा नसावी.

## ४.२ सदुपदेशकांचे गुणधर्म

सदुपदेशन करण्यापूर्वी तसेच सदुपदेशनादरम्यान, सदुपदेशन संबंधाचा अधिकाधिक फायदा घेण्यासाठी सदुपदेशक व सदुपदेशग्रही यांच्याकडे काही वैशिष्ट्ये असणे व ती शिकणे आवश्यक आहे. सदुपदेशकाच्या अंगी काही महत्त्वाचे गुण असावेत ज्यामुळे सदुपदेशन कार्यक्रमाचे इच्छित अध्ययन परिणाम मिळू शकतील. असे काही गुणधर्म आहेत जे सदुपदेशन नातेसंबंधात भूमिका पार पाडण्यास सक्षम होण्यासाठी अत्यावश्यक मानले जाऊ शकतात, तर काही गुणधर्म सदुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे आणि सतत क्षमता-विकसन कार्यक्रमांद्वारे विकसित केले जाऊ शकतात.

सदुपदेशन पद्धतीच्या संदर्भानुसार पुढे एक गुणधर्मांची एक यादी आहे. ही यादी सदुपदेशक निवडीसाठी प्रारंभ बिंदू म्हणून काम करू शकते आणि पुढे, सदुपदेशक प्रशिक्षणासाठी एक संदर्भ बनू शकते.

अ. **विविधतेची जाणीव :** या संदर्भात, विविधतेची जाणीव असणे म्हणजे सदुपदेशन कार्यक्रमाच्या दरम्यान, प्रस्तुत वातावरणात विविध लोक, गट आणि मते यांच्या अस्तित्वाची जाणीव असणे. व यामध्ये सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी, लिंग, वय, संस्कृती, जात, धर्म आणि विविध सदुपदेशक आणि सदुपदेशग्रहीच्या इतर पैलूंशी संबंधित वैयक्तिक भेदांची जाणीव आणि समावेश आहे.

ब. **प्रभावी संप्रेषण :** प्रभावी संवाद हा सदुपदेशकाचा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे. यात कल्पना, संकल्पना, ज्ञान, विचार आणि भावना संक्षिप्त आणि खात्रीशीर पद्धतीने संवाद साधण्याची क्षमता समाविष्ट आहे. तसेच, सक्रिय ऐकणे, समजून घेणे आणि इतरांना प्रतिसाद देणे हे सदुपदेशकांसाठी तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणून, कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रभावी संवाद आवश्यक आहे.

स. **सहानुभूती :** सदुपदेशकानी त्यांच्या सदुपदेशग्रहीबद्दल सहानुभूती दाखवली पाहिजे, त्यांचे दृष्टीकोन, भावना, विचार आणि अनुभव समजून घेतले पाहिजे. यामुळे सदुपदेशकाला योग्य प्रकारे मार्गदर्शन व सहाय्य पुरविता येते.

ड. **अनुभव :** या परिस्थितीत 'अनुभव' महत्त्वाचा आहे कारण सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही हे दोघेही या कार्यक्रमातील महत्त्वाचे घटक आहेत. सदुपदेशकानी त्याच्या व्यावसायिक विकासाच्या संपूर्ण काळात एकत्रित केलेले ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता म्हणजेच सदुपदेशकाचा अनुभव होय. सदुपदेशग्रही ज्या परिस्थितीत आहे व ज्या आव्हानांना त्याला सामोरे जावे लागत आहे, त्या परिस्थितीचा सदुपदेशकाला प्रगाढ अनुभव असणे गरजेचे आहे. या अनुभवाद्वारेच तो सदुपदेशग्रहीशी योग्य उपक्रम (उपाय) सामायिक करू शकतो.

ई. **निपुणता :** विशिष्ट विषय, व्यवसाय किंवा क्षेत्रात उच्च दर्जाचे ज्ञान, कौशल्य किंवा प्रवीणता असलेल्या व्यक्तीचे वर्णन करण्यासाठी वापरला जाणारा शब्द म्हणजे तज्ञ. सदुपदेशक हा त्याच्या क्षेत्रातील किंवा ज्ञानशाखेतील तज्ञ असणे आवश्यक आहे ज्यायोगे तो सदुपदेशग्रहीला त्या क्षेत्रातील सखोल ज्ञान प्राप्त करून देईल व उत्कृष्ट उपक्रम सुचविल.

फ. **लवचिकता :** सदुपदेशन करण्याच्या दृष्टिकोनात लवचिकता असणे हा सदुपदेशकाचा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे. सदुपदेशन कार्यक्रमादरम्यान सदुपदेशकाला सदुपदेशग्रहीची गरज ओळखून आपला आशय व पद्धती यामध्ये योग्य तो बदल घडवून आणता आला पहिजे. सर्व सदुपदेशग्रहीना आशय सहज उपलब्ध करून देण्यासाठी तिला/त्याला विविध प्रकारे सादरीकरण करण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. प्रक्रियेतील लवचिकता आणि दृष्टीकोन या दोन्ही गोष्टी सदुपदेशन कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावतात.

ग. **प्रेरणादायी :** यशस्वी सदुपदेशक प्रेरणादायी असतो. जे सदुपदेशक सदुपदेशग्रहीना प्रेरणा देतात, ते सदुपदेशग्रहीमध्ये उत्कटता, उत्साह व उमेद निर्माण करून त्यांच्या सर्व क्षमतांचा सर्वात जास्त वापर घडवून आणतात. एक प्रेरणादायी सदुपदेशक सदुपदेशग्रहीला उच्च कामगिरीसाठी प्रयत्न करायला लावतो आणि कामगिरीच्या उच्च अपेक्षा ठेवतो. त्यांच्या स्वत: च्या कृती आणि यशांद्वारे उदाहरण देऊन, महान गोष्टी साध्य करता येतात, ते त्यांच्या सदुपदेशग्रहीना त्यांच्या समाधान परीघामधून (कम्फर्ट झोन) पुढे जाण्यासाठी आणि त्यांच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करण्यास प्रेरित

करतात.

ह. **नेतृत्व कौशल्ये** : सर्वांचे ध्येय किंवा उद्दिष्टाकडे नेण्यासाठी, प्रभावित करण्यासाठी आणि प्रेरणा देण्यासाठी, सदुपदेशकाकडे नेतृत्व गुण आणि वर्तन असणे आवश्यक आहे. सदुपदेशग्रहीना प्रोत्साहन देण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी, सदुपदेशन संबंधांवर प्रभाव टाकण्यासाठी, सदुपदेशकामध्ये नेतृत्व कौशल्ये असणे महत्त्वपूर्ण आहेत.

य. **चिकित्सात्मक विचार** : सदुपदेशकासाठी, तर्क आणि कारणांच्या आधारे कल्पना, विचार, परिस्थिती इत्यादींचे विश्लेषण आणि मूल्यमापन करणे महत्वाचे आहे. पुरावे न मागता तथ्ये किंवा माहिती स्वीकारण्यापेक्षा, भिन्न दृष्टीकोनांचा विचार करून सदुपदेशकानी नेहमी तर्कशुद्धपणे समस्या सोडवल्या पाहिजेत . सदुपदेशग्रहीनी परिस्थितीला योग्य प्रकारे सामोरे जाण्यासाठी, तिच्याशी जुळवून घेण्यासाठी, आपल्या कृतींचे मूल्यमापन करण्यासाठी व अडथळे व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सदुपदेशकाची चिकित्सात्मक विचारप्रक्रिया उपयुक्त ठरते.

ज. **सर्जनशीलता** : सर्जनशीलता सदुपदेशकाला नवीन कल्पना तयार करण्यासाठी आणि आव्हानांवर मात करण्यास सक्षम करण्यासाठी व नाविन्यपूर्ण उपाय तयार करण्यासाठी सज्ज करते. यामुळे सदुपदेशग्रहीच्या आव्हानांवर मात करता येते. नवीन कल्पना, संकल्पना आणि दृष्टीकोन वापरून नवनवीन उपाय शोधण्यासाठी सदुपदेशग्रहीना प्रोत्साहित करणे देखील महत्त्वाचे आहे.

म. **चिंतनशीलता** : चिंतनशील कौशल्ये सदुपदेशकाना त्यांच्या विचारांवर आणि कल्पनांवर आत्मचिंतन करण्यासाठी, सदुपदेशन सत्रांचे मूल्यांकन करण्यास, सक्रियपणे सदुपदेशग्रहीकडून अभिप्राय मिळविण्यास आणि सदुपदेशक म्हणून सतत विकास करण्यास सक्षम करतात. हे सदुपदेशकाना त्यांची कार्यनीती सुधारण्यात, सदुपदेशग्रहीच्या गरजा समजून घेण्यास आणि अर्थपूर्ण मार्गदर्शन आणि सहाय्य प्रदान करण्यात मदत करते. सदुपदेशग्रहीना चिंतनशील कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करणे देखील सदुपदेशकासाठी महत्वाचे आहे.

उपरोक्त गुणधर्मांव्यतिरिक्त, सदुपदेशग्रहीच्या आव्हानांना समजून घेण्यासाठी आणि त्यांना पुरेसा पाठिंबा देण्यासाठी सदुपदेशकाकडे उच्च भावनिक बुद्धी असणे आवश्यक आहे. पुढे सदुपदेशक व्यक्तिमत्वाची काही उदाहरणे आहेत:

**सदुपदेशक व्यक्तीमत्त्व १**

सुश्री.अस्मिता पंत या केंद्रीय विद्यालयात प्राचार्या आहेत. त्या गेली 20 वर्षे दोन शाळांमध्ये शाळाप्रमुख आहे आणि १० वर्षांपूर्वी केंद्रीय विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून रुजू झाल्या. एक शिक्षिका म्हणून, त्यांनी कालांतराने अध्यापनशास्त्रात नैपुण्य विकसित केले आणि त्यांचे ज्ञान आणि अनुभव याचा वापर संपूर्ण शालेय सुधारणा करण्यासाठी होते. त्यांनी काही नेतृत्व उपक्रम पूर्ण करून आणि संघ आणि संस्थांच्या व्यवस्थापनाबद्दल स्वतःची समज सुधारून घ्यायला सुरुवात केली. त्यांनी त्यांच्या शाळेतील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे ऐकले आणि सुधारणा आवश्यक असलेले क्षेत्र ओळखले. शिक्षक आणि कर्मचाऱ्यांशी आव्हानात्मक क्षेत्रांबद्दल बोलत असताना, प्रत्येकाची ताकद आणि विकासाची क्षेत्रे वेगवेगळी असतात हे समजून त्या मोकळया मनाने ऐकायच्या. अभिप्राय देताना, त्या विधायक टीकेवर लक्ष केंद्रित करून, दोन्ही ताकद आणि विकास क्षेत्रे

ओळखून त्यांचा अभिप्राय सुनिश्चित करत असत. कृतींमध्ये बदल घडवून आणण्यासाठी व कामावर होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी त्या सतत स्वतः केलेल्या कृतीवर विचार करत असत व त्या कृतीमुळे झालेल्या परिणामांवर मनन करत असत. त्या स्वतः सुद्धा सतत अध्ययन करत असत आणि सतत अध्ययन चालू ठेवल्यामुळे प्रगती कशी होते याची उदाहरणे देण्यासाठी व आपल्या कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासनासाठी त्या नेहमी कार्यशाळांचे आयोजन करत असत व त्याद्वारे आपल्या सहकाऱ्यांना प्रोत्साहन देत असत. त्यांच्या शिक्षकांना जेव्हा आवश्यक असेल तेव्हा सहाय्य पुरवण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षकांची काळजी घेण्यासाठी व ते नेहमी सुरक्षित व आरामदायक राहतील यासाठी त्या नेहमी कार्यरत असत. त्यांच्या संभाषण कौशल्यामुळे त्या काय सांगत आहेत व काय करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत याकडे सर्वांचे लक्ष असे. शाळा सुधारण्यासाठी विविध प्रकल्प राबवलेले असल्यामुळे आता त्यांना इतर शाळांच्या प्रगतीसाठी व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी या सर्व वर्षांमध्ये मिळालेल्या अनुभवाचा उपयोग होत आहे. देशातील विविध संदर्भातील शाळांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांना अजून चांगल्या प्रकारच्या शाळा बनवण्यासाठी त्या आता सदुपदेशन करू इच्छितात.

**सदुपदेशक व्यक्तीमत्त्व २**

सी.बी.एस.सी संलग्नित शाळेतील श्री अमरपाल बालेंग हे भूगोल शिक्षक आहेत. ते वीस वर्षे अध्यापन करत आहेत आणि शाळेतील इतर शिक्षकांसाठी ते सतत प्रेरणा स्रोत आहेत. त्यांच्या अध्यापन कौशल्याबरोबरच, ते इतर शिक्षकांचे म्हणणे नेहमी ऐकून घेतात व नवीन शिक्षकांना शाळेतील संस्कृतीबरोबर समायोजन करून घेण्यासाठी मदत करतात. त्यांच्याकडे संस्थेतील विविध सदस्यांना सहाय्य करण्याचे व मदत करण्याचे कौशल्य सुद्धा आहे त्यामुळे त्यांचा एक प्रेरणादायी मार्गदर्शक म्हणून सन्मान केला जातो. त्यांना सुरक्षिततेचे, व्यावसायिकतेचे आणि कामातील उच्च दर्जाचे महत्त्व माहित आहे आणि ते त्यांच्या कृतीतूनही दिसतेही. आता त्यांना त्यांच्या तज्ञतेचा उपयोग इतर शिक्षकांना सुरक्षित वाटावे, सहाय्य मिळावे , मार्गदर्शन मिळावे शाळेत स्थिर व्हावे यासाठी करायचं आहे. तसेच त्यांचे व्यावसायिक जीवन कृतकृत्य व्हावे म्हणून त्यांचा भागीदार बनायचे आहे.

## ४.३ सदुपदेशग्रहीची वैशिष्ट्ये

सदुपदेशन नातेसंबंध यशस्वी होण्यासाठी, सदुपदेशग्रहीने ध्येय-केंद्रित असले पाहिजे, पुढाकार घ्यावा, आव्हाने शोधली पाहिजे, शिकण्यासाठी आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी उत्साह दाखवला पाहिजे. त्यांनी सक्रियपणे भाग घेतला पाहिजे, ज्ञानाव्यतिरिक्त नवीन क्षमता शोधल्या पाहिजेत, स्वतःच्या जबाबदाऱ्या आणि यशासाठी अनेक प्रभावांसाठी खुले राहिले पाहिजे.[9] सदुपदेशग्रहीची पुढे काही वैशिष्ट्ये दिली आहेत:

[9]National Institute of Technical Teachers Training and Research. (2020, September). Making Mentoring Relevant: NEP 2020 PERSPECTIVE.

**सदुपदेशग्रही व्यक्तीमत्त्व १**

श्री सेलवा कुमार हे केंद्रीय विद्यालयात शिक्षक आहेत. ते बारा वर्षापासून शालेय शिक्षक आहेत. त्यांनी शालेय शिक्षणाबद्दल चे विविध अभ्यासक्रम केलेले आहेत कारण त्यांना नवनवीन शिकायला आवडते आणि त्यांची स्वतःची भूमिका बदलायला आवडते. त्यांना त्यांच्या सर्वसाधारण शाळेमध्ये एक उत्कृष्ट शाळा होण्याची क्षमता दिसून येते आणि आपल्या विद्यार्थ्यांसाठी एक चांगला अनुभव देता येईल अशी शाळा त्यांना बनवायची आहे. आता ते सदुपदेशकांकडून मार्गदर्शन घेत आहेत ज्यायोगे त्यांच्या शाळेचा विकासाच्या दिशेने मार्गक्रमण होईल आणि आता ते नवीन गोष्टी शिकण्याबद्दल उत्सुक आहेत.

**सदुपदेशग्रही व्यक्तीमत्त्व २**

सुश्री संगीता प्रधान या जवाहर नवोदय विद्यालयामध्ये इंग्लिश विषयाच्या शिक्षिका आहेत. अध्यापनातील व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांनी केलेली ही पहिलीच नोकरी आहे. नोकरी सुरू केल्यावर त्यांनी काही काळ आपण घेतलेल्या प्रशिक्षणाचे उपयोजन करण्यास सुरुवात केली. सातवी व आठवीतील विद्यार्थ्यांबरोबर काम करण्याचे आव्हान मोठे होते. त्यांच्या अध्ययन गरजा विविध होत्या. कुमारी प्रधान यांनी ठरविले की थोडा वेळ देऊन इतर शिक्षकांशी संबंध प्रस्थापित करायचे व त्यांच्याबरोबर जुळवून घ्यायचे आणि त्यांचा आधार घेऊन काम करायचे. सतत मनन केल्यामुळे, काही कार्यशाळांना उपस्थित राहिल्यामुळे व आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केल्यामुळे त्यांना त्यांच्या वर्गअध्यापनात आलेल्या अडचणींवर सहज मात करता आली आणि आता त्या शिकण्यासाठी व सदुपदेशन करण्यासाठी तयार आहेत.

## ४.४ सदुपदेशक विकास

सदुपदेशकांना यशस्वी सदुपदेशन संबंध जास्तीत जास्त सक्षम करण्यासाठी साधने आणि संधी प्रदान केल्या पाहिजेत. सदुपदेशक विकास हा दोन टप्प्यांवर कोणत्याही मार्गदर्शन कार्यक्रमाचा एक भाग असावा:

अ. सदुपदेशकाची एकदा निवड झाली की, सदुपदेशन परस्परसंवाद चांगल्या प्रकारे होण्यासाठी सदुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमाची मदत होऊ शकते.

ब. सदुपदेशन कार्यक्रम चालू असताना, सतात्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी (CPD) दिलेल्या संधी सदुपदेशकाला मदत करू शकतात व त्यांच्या सदुपदेशक म्हणून विकास घडवतात.

### ४.४.१ सदुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम

सदुपदेशकांकडे शिस्त, संप्रेषण, सहानुभूती आणि भावनिक बुद्धिमत्ता, समस्या सोडवण्याची कौशल्ये, वेळ व्यवस्थापन आणि नेतृत्व कौशल्ये यासारखी व्यावसायिक कौशल्ये असतात. ही व्यावसायिक कौशल्ये त्यांना सदुपदेशन कार्यक्रमादरम्यान त्यांच्या सदुपदेशग्रहीला समर्थन किंवा मार्गदर्शन देण्यास सक्षम करतात. सदुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे सदुपदेशकाला दोन क्षेत्रात विकसित होण्यास मदत केली पाहिजे: मूलभूत सदुपदेशन कौशल्यांचा विकास आणि सदुपदेशन प्रकारांबद्दल उद्बोधन.

### ४.४.१.१ सदुपदेशनाची मूलतत्त्वे (मुख्य कौशल्ये)

काही कौशल्ये आहेत जी या प्रशिक्षणात समाविष्ट होऊ शकतात:

**सारणी ४.१: कौशल्ये, घटक आणि वर्णन**

| कौशल्ये | घटक | वर्णन |
|---|---|---|
| संप्रेषण | सक्रिय श्रवण (लक्षपूर्वक ऐकणे ) | सदुपदेशन, कठीण संभाषणे इत्यादींमध्ये सक्रिय ऐकण्याचे महत्त्व आणि मुख्य घटक. |
| | चिंतनशील आणि सखोल प्रश्न विचारणे | वेगवेगळ्या परिस्थितींसाठी, विविध प्रकारचे प्रश्न विचारून अर्थपूर्ण संभाषण करणे |
| | अभिप्राय देणे आणि घेणे | विधायक अभिप्राय प्रभावीपणे घेण्यासाठी आणि देण्यासाठी सूचना |
| नेतृत्त्व | संक्रमण व्यवस्थापन | संस्थात्मक बदल आणि त्याबद्दल संवाद साधून लोकांना सकारात्मक नेतृत्व आणि प्रेरित करण्याचे मार्ग |
| | दृष्टी आणि ध्येये निश्चित करणे | सदुपदेशन नातेसंबंधासाठी अर्थपूर्ण दृष्टी आणि स्मार्ट(SMART) उद्दिष्टे ठरविणे |
| | जबाबदारी निर्माण करणे | समूहात जबाबदारी यशस्वीरित्या तयार करणे आणि अधिकृत योजना, देखरेख आणि प्रतिसाद देण्याची कौशल्ये दर्शवणे |
| | वाढीची मानसिकता विकसित करणे | वाढीच्या मानसिकता तयार करणे आणि स्वत:ची आणि त्यांच्या सदुपदेशग्रहीची मानसिकता वाढविण्यासाठी सहयोगी धोरणे तयार करणे. |
| | वेळेचे व्यवस्थापन | वेळ आणि कार्ये व्यवस्थापित करण्यासाठी आणि प्राधान्य देण्यासाठी सूचना |
| | संस्कृती विकसन | चांगला संघ / सदुपदेशग्रही गट संस्कृति तयार करण्यासाठी मार्ग आखणे आणि अंमलात आणाणे |
| इतर उदयोन्मुख कौशल्ये | आंतरजाल तयार करणे (नेटवर्किंग ) | हेतुपुरस्सर समस्या सोडवण्यासाठी, मुख्य सक्षमकर्ता म्हणून आंतरजालाचे (नेटवर्किंगचे) महत्त्व लक्षात घेणे |
| | सदुपदेशन आणि त्याचे सार | सदुपदेशनाच्या मार्गांसह, सदुपदेशन आणि त्याचे महत्त्व परिभाषित करणे |

### ४.४.१.२ सदुपदेशनाचे प्रकार

सदुपदेशन परस्परसंवाद आभासी आणि भौतिक दोन्ही-मध्यमाद्वारे, तसेच समकालिक (सिंक्रोनस) किंवा असमकालिक (असिंक्रोनस) पद्धतीने आयोजित केला जाऊ शकतो. सदुपदेशनाचे पुढील प्रकारात विभाजन

केले जाऊ शकते:

जेव्हा सदुपदेशनातील परस्परसंवाद अध्ययन, सामायिक करणे (शेअर )समस्या सोडवणे आणि एकमेकांशी सहसंबंध प्रस्थापित करणे या चार तत्वांवर आधारित असतात तेव्हा सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही यांच्यातील अंतरक्रिया या एक रचनात्मक अनुभव बनतात व सदुपदेशग्रहीच्या संदर्भातील समस्या सोडविण्यास उपयुक्त ठरतात. पुढे दिल्याप्रमाणे, हे वेगवेगळया प्रकारच्या सदुपदेशनाद्वारे साध्य केले जाऊ शकते :

### अ. वैयक्तिक सदुपदेशन

वैयक्तिक सदुपदेशन हे वैयक्तिक प्रकारचे , ज्ञान-सामायिकरण संभाषण आहे जे सहभागी त्यांच्या आवडीच्या विषयावर करू शकतात. सदुपदेशक व सदुपदेशग्रही यांच्यातील ती विशिष्ट विषयांवरील चर्चा आहे. सामायिक करण्यासाठी, शिकण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी सदुपदेशग्रही विश्वासार्ह व्यक्तीशी (सदुपदेशक किंवा समवयस्क) संबंध प्रस्थापित करणे निवडू शकतो. सदुपदेशक, सदुपदेशग्रहीना त्यानी आत्मसात केलेली कौशल्ये आणि ज्ञान बळकट करण्यात मदत करतात आणि त्यांना येणाऱ्या आव्हानांमध्ये ज्ञान आणि कौशल्य कसे वापरायचे हे त्यांना समजावून सांगतात.

एकास एक सदुपदेशनाच्या या पद्धतीद्वारे, सदुपदेशग्रहीसाठी ही क्रिया एक अंतर्दृष्टीपूर्ण प्रवास बनते. ते त्यांच्या क्षमतांवर दृढ विश्वास निर्माण करताना त्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिकरित्या वाढण्यास मदत करते. हे सदुपदेशग्रहीच्या वाढीस मदत करते. सदुपदेशकासाठी, तो ज्या समुदायाचा घटक आहे त्याच्यासाठी योगदान देण्याची संधी म्हणून काम करते.

### ब. गट (समूह) सदुपदेशन

समूह सदुपदेशनामध्ये, समान आव्हानांना तोंड देणाऱ्या सदुपदेशग्रहीचा एक गट सामील आहे. हे सदुपदेशग्रहीसाठी उपयुक्त आहे. ज्यांना समवयस्कांकडून शिकायचे आहे आणि आंतरजाल (नेटवर्क) तयार करायचे आहे.

### क. चर्चा मंडळे (ज्ञान हस्तांतरण सदुपदेशन)

चर्चा मंडळे (सदुपदेशन मंडळे) याद्वारे संकल्पना (धोरण, योजना इ.) आणि समाजाच्या गरजांशी संबंधित सर्वोत्तम कार्यपद्धती सुलभ करता येते. या ठिकाणी तज्ज्ञ लोक त्यांचे ज्ञान, अनुभव आणि अध्ययन इतरांशी सामायिक करतात व सदुपदेशकाची भूमिका घेतात. सदुपदेशन मंडळे कृतियुक्त अध्ययन व सदुपदेशन या दोन्हीचे सुंदर एकात्मिकरण करतात. सदुपदेशग्रहीना एकत्रितपणे शिकण्यासाठी, प्रगती करण्यासाठी व त्यांना प्रेरित करण्यासाठी या मंडळांचा उपयोग केला जाऊ शकतो. समान आव्हानांना तोंड देत असलेल्या लोकांसाठी किंवा सामूहिक ज्ञान निर्माण करू पाहणाऱ्यांना त्या विशिष्ट संकल्पनेतील ज्ञान, अनुभव आणि कौशल्य असलेल्या व्यक्तीकडून सदुपदेशन घेणे आणि सदुपदेशन घेत असताना विविध शक्यता आजमावण्यासाठी आणि चर्चा

करण्यासाठी एकत्र येणे सोपे होते: मार्गदर्शक मंडळे निवडण्याची संधी, त्यांना काय शिकायचे आहे आणि कोणाकडून शिकायचे आहे हे निवडण्यासाठी त्यांना संधी मिळते.

**ख. समवयस्क सदुपदेशन**

या प्रकारामध्ये, व्यावसायिकांचा एक गट ज्यांनी विशिष्ट आव्हानांवर यशस्वीरित्या मात केली आहे किंवा विशिष्ट क्षेत्रामध्ये कौशल्य विकसित केले आहे, ते समवयस्कांसाठी चर्चा आणि सदुपदेशनासाठी उपलब्ध होतात. समवयस्क सदुपदेशन सत्रे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून ज्ञान आणि अनुभव सामायिक करून समवयस्कांमधील सहायक संबंध वाढवू शकतात. हे सदुपदेशग्रहीला समान संदर्भ असलेल्या लोकांचे विश्वासार्ह आंतरजाल (नेटवर्क) प्राप्त करून देते, जेणेकरुन त्यांच्या सर्वोत्तम पद्धती सामायिक करु शकतात  आणि त्याच वेळी त्यांच्या ज्ञानात देखील भर पडते. समवयस्क सदुपदेशन म्हणजे द्वि-मार्गी, परस्पर फायदेशीर अध्ययन प्रक्रिया होय. सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही हे दोघेही ज्ञान आणि अनुभव सामायिक करतात. या वस्तुस्थितीमुळे ते दोन्ही घटकासाठी फायदेशीर आहे. समवयस्क सदुपदेशक सदुपदेशग्रहीचे मार्गदर्शन आणि समर्थन करतात आणि म्हणून, सदुपदेशग्रही स्वतःला विविध मार्गांनी मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन करतात आणि त्यातून त्यांना अध्ययन करण्यास मदत मिळते. याचा उपयोग "उत्कृष्ट उपक्रम सामायिक करण्यासाठीचा" मंच म्हणूनही होतो.

**ग. प्रसंगनिष्ठ (परिस्थितीजन्य) सदुपदेशन**

या प्रकारात, उपाय शोधण्याच्या अपेक्षेने अनेक सदुपदेशग्रही एका विशिष्ट सामान्य संघर्षासह आंतरजाल (नेटवर्क)/ सदुपदेशकापर्यंत पोहोचतात. हा प्रकार सामूहिक समस्या सोडवण्याची उत्तम संधी म्हणून काम करतो.

**घ. त्वरित सदुपदेशन**

त्वरित सदुपदेशन हे अल्प-मुदतीचे सदुपदेशन आहे जे एका संक्षिप्त आणि केंद्रित कालावधीत होते. हे सामान्यत: अशा परिस्थितीत वापरले जाते जेथे व्यक्तींना विशिष्ट समस्या किंवा विषयावर त्वरित मार्गदर्शन आणि सहाय्य आवश्यक असते. कमी कालावधीत मौल्यवान अंतर्दृष्टी आणि सहाय्य मिळवण्याचा हा एक लवचिक आणि कार्यक्षम मार्ग आहे.

वर सांगितले गेलेले प्रकार सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही यांच्यातील परस्परसंवादाला प्रोत्साहन देण्यासाठी असले तरी, सदुपदेशनपर परस्परसंवाद साधण्याचे इतर मार्ग सुद्धा शक्य आहेत. हे खालील सारणीमध्ये दर्शविल्याप्रमाणे, समकालिक(सिंक्रोनस)  किंवा असमकालिक (असिंक्रोनस) पद्धती वापरून ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमांच्या संयोजनाद्वारे असू शकते:

**सारणी ४.२: सदुपदेशनाच्या पद्धती**

| पद्धती →<br>माध्यमे ↓ | समकालिक (सिंक्रोनस) | असमकालिक (असिंक्रोनस) |
|---|---|---|
| **ऑनलाइन** | वर वर्णन केल्याप्रमाणे, ऑनलाइन संवाद साधने वापरुन<br><br>*जेथे वैयक्तिक सत्रे शक्य होणार नाहीत कारण सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही वेगवेगळ्या भौतिक ठिकाणी असतात, तेथे मोठ्या प्रमाणात सदुपदेशन कार्यक्रमांसाठी हे सर्वात उपयुक्त संयोजन असू शकते .* | काम देण्यासाठी तसेच अभिप्राय देण्यासाठी, चिंतनशील स्वाध्याय, व्यक्ती अभ्यास आनुषंगिक प्रश्न देण्यासाठी ऑनलाइन साधनांचा वापर<br><br>*आत्म-प्रतिबिंब आणि स्वयं-अध्ययनाच्या वेळेस प्रोत्साहित करण्यासाठी, ऑनलाइन-सिंक्रोनस कार्यक्रमाव्यतिरिक्त याचा वापर केला जाऊ शकतो.* |
| **ऑफलाइन** | वर वर्णन केल्याप्रमाणे, सर्व मोड वैयक्तिक परिस्थितिमध्ये<br><br>*हे संयोजन लहान-प्रमाणातील कार्यक्रमांसाठी सर्वात उपयुक्त असू शकते आणि केवळ ऑनलाइन मोडपर्यंत संप्रेषण मर्यादित न ठेवता सदुपदेशनपर संवाद वाढवेल.* | ऑफलाइन साधने जसे की पुस्तके, क्रियाकलाप साधने, अनुभव कार्यक्रम इ. नियुक्त केले जाऊ शकतात.<br><br>*हे संयोजन अधिक सानुकूलित ऑनलाइन/ऑफलाइन - सिंक्रोनस सदुपदेशन कार्यक्रमाव्यतिरिक्त स्वयं-अध्ययनाला प्रोत्साहन देण्यासाठी वापरले जाऊ शकते.* |

### ४.४.२ सदुपदेशकांसाठी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास

सदुपदेशकांचे प्रशिक्षण सतत झाले पाहिजे आणि सदुपदेशक अधिक सदुपदेशनपर संवाद साधत असल्याने ते पुढे गेले पाहिजे. उदाहरणार्थ, सदुपदेशकांना विविध कौशल्ये आणि त्यानंतरच्या घटकांची ओळख करून देण्यासाठी सदुपदेशकांचे प्रशिक्षण वेगवेगळया स्तरांवर घेतले जाऊ शकते, जे त्यांच्या चालू असलेल्या क्षमता वाढीसाठी मदत करू शकते:

**सारणी ४.३ : सदुपदेशक प्रशिक्षण आणि कौशल्याची पातळी**

| पातळी १ | पातळी २ | पातळी ३ |
|---|---|---|
| सदुपदेशन आणि त्याचे सार | चर्चा मंडळे | जबाबदारीची जाणीव निर्माण करणे |
| दृष्टी आणि ध्येये निश्चित करणे | संस्कृति विकसन | आंतरजाल तयार करणे (नेटवर्किंग ) |
| गट सुविधा | वैयक्तिक सदुपदेशन | समवयस्क सदुपदेशन |
| व्यक्ती अभ्यास आधारित चर्चा | सखोल चौकशी करणारे प्रश्न | संक्रमण |

| | विचाणे | |
|---|---|---|
| समकालिक (सिंक्रोनस) सुविधा | अभिप्राय देणे व घेणे | वाढीची मानसिकता |
| सक्रिय श्रवण (लक्षपूर्वक ऐकणे ) | | वेळेचे व्यवस्थापन |
| असमकालिक (असिंक्रोनस) सुविधा | | |
| सखोल चौकशी करणारे प्रश्न विचाणे | | |

याव्यतिरिक्त, सदुपदेशग्रहीशीच्या चर्चेची क्षितिजे विस्तृत करण्यासाठी आणि अधिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी, व्यवस्थापकांना प्रशासकीय संस्थांद्वारे मिळालेल्या क्षमतामध्ये वाढ करण्याची संधी सदुपदेशकांना मिळायला हवी. सी.पी.डी मध्ये सदुपदेशकांना वेळोवेळी गुंतवून ठेवण्याची रचना सदुपदेशकांच्या विकासासाठी आवश्यक आहे आणि ती तज्ञांची सत्रे, वेबिनार, क्षमता वाढीसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम इत्यादीद्वारे पूर्ण केली जाऊ शकते.

## ४.५ सदुपदेशनाची क्षेत्रे

वर नमूद केलेल्या विविध प्रकारच्या सदुपदेशनाचा उपयोग वेगवेगळ्या क्षेत्रांवर आधारभूत सदुपदेशन करण्यासाठी केला जाऊ शकतो. सदुपदेशन कार्यक्रमाच्या उद्दिष्टांवर, लाभार्थी (भागधारकां) च्या गरजा आणि संदर्भानुसार, कोणत्याही क्षेत्रात सदुपदेशन केले जाऊ शकते. सदुपदेशन सत्रासाठी सर्वात संबंधित सदुपदेशन विषय शोधण्यासाठी खालील क्षेत्रे (तक्ता 4.4) उदाहरणे म्हणून वापरली जाऊ शकतात.

**सारणी ४.४ : सदुपदेशनाची क्षेत्रे व व्याख्या**

| सदुपदेशनाची क्षेत्रे | व्याख्या |
|---|---|
| **अध्यापनशास्त्रीय आशय ज्ञान (पीसीके) - शालेय विषय/विषयांचा आशय जाणून घेणे आणि समजून घेणे.** | पी.सी.के (PCK) हा शिक्षकाच्या विषयाचे आणि शैक्षणिक ज्ञानाचे वर्णन करण्यासाठी दिलेला वाक्प्रचार आहे. आशय ज्ञान म्हणजे विशिष्ट विषय/विषयांशी संबंधित जसे गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र, कला इ. बद्दल तथ्ये, सिद्धांत, तत्त्वे आणि संकल्पना समजून घेणे. दुसरीकडे, अध्यापनशास्त्रीय ज्ञान म्हणजे अध्ययन-अध्यापन प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्याला मदत करण्यासाठी शिक्षकाने वापरलेल्या पद्धती आणि धोरणे होय. |
| **पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान** | एन.ई.पी २०२० मध्ये म्हटल्याप्रमाणे, २०२५ पर्यंत प्राथमिक शाळांमध्ये सार्वत्रिक पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान प्राप्त करणे याला सर्वोच्च प्राधान्य आहे. विद्यार्थ्याने इयत्ता ३ पर्यंत पोहोचेपर्यंत, त्याला /तिला अर्थपूर्ण वाचन आणि लेखन करण्यात आणि अंकांशी संबंधित मूलभूत समज विकसित झाली असावी. मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र शाळेच्या एकत्रीकरणाद्वारे तसेच त्यांच्या वर्गाबाहेरील जीवनाद्वारे प्राप्त केले जाऊ शकते. |

| | |
|---|---|
| **न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण** | एन.ई.पी २०२०, सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे या संकल्पनेला चालना देणारे, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षणावर जोर देते. यात वंचित गटांसाठी निर्माण झालेल्या आव्हानांचा विचार केला गेला आहे. (महिला, ट्रान्सजेंडर गट, अनुसूचित जाती आणि जमाती, इतर मागास वर्ग, दिव्यांग आणि इतर वंचित गट). हे धोरण सर्व मुलांसाठी सर्वसमावेशक शिक्षणाचे वातावरण निर्माण करण्याची हमी देते. |
| **क्षमता आधारित शिक्षण** | क्षमता-आधारित शिक्षण हा एक असा दृष्टीकोन आहे जो दृढ अभ्यासक्रम (न बदलणारा) आणि विशिष्ट वेळेत पूर्ण करावा लागणारा अभ्यासक्रम चालू ठेवण्याऐवजी अभिवृत्ती, ज्ञान आणि कौशल्ये विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करतो, जे निरीक्षण करण्यायोग्य आणि मोजण्यायोग्य असू शकतात. क्षमता-आधारित शिक्षणाचे उद्दीष्ट हे सुनिश्चित करणे आहे की, विद्यार्थ्यांकडे असलेले त्यांचे ज्ञान वास्तविक जीवनातील परिस्थितींमध्ये लागू करण्याची क्षमता आहे. |
| **कथाकथन आणि खेळण्यांवर आधारित अध्यापनशास्त्र** | एन.ई.पी २०२० आणि पायाभूत स्तरावरील राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २०२२, शिकण्याच्या मूलभूत टप्प्यावर मुलांसाठी कथाकथन आणि खेळण्यांवर आधारित अध्यापनशास्त्राची महत्त्वपूर्ण शिफारस करतात. मुलांनी सुरुवातीच्या टप्प्यात ग्रहण केलेली वैचारिक समज खेळणी-आधारित अध्यापनशास्त्राद्वारे बळकट केली जाऊ शकते. हे मुलांच्या सामाजिक, भावनिक वाढ, कल्पकता आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देईल. |
| **अनुभवजन्य अध्ययन** | एन.ई.पी २०२० अनुभवजन्य शिक्षणाला (अनुभव आधारीत शिकण्याला) प्राधान्य देण्याचे सुचविते . यामध्ये प्रत्येक विषयाच्या पारंपारिक शिकवण्याच्या पद्धतीमध्ये "प्रत्यक्ष अनुभव घेऊन शिकणे (हॅन्ड्स-ऑन), कला आणि क्रीडा यांचा संगम असलेले शिक्षण आणि कथालेखनावर आधारित शिकवण्याची पद्धत" यांचा समावेश आहे. |
| **भारतीय ज्ञान** | भारतीय ज्ञान आणि विचारधारा शिक्षणाचा एक भाग म्हणून नेहमीच ज्ञान, विवेक आणि सत्याच्या शोधाचा विचार करतात. भारतीय ज्ञानात शिक्षणाचा उद्देश म्हणजे आत्मसाक्षात्कार आणि मुक्ती, तसेच व्यक्तीला जीवनासाठी तयार करणे होय. प्राचीन भारतीय ज्ञानाच्या घटकांना वैज्ञानिक पद्धतीने हाताळले जाऊ शकते. |
| **कृती संशोधन** | कृती संशोधन ही एक प्रकारची पद्धतशीर चौकशी आहे, जी शिक्षण क्षेत्रातील आणि शाळेतील विशिष्ट समस्यांवर लक्ष केंद्रित करते. शिक्षकांनी अध्ययन-अध्यापन धोरणांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आणि निर्णय |

| | |
|---|---|
| | घेण्यात मदत करण्यासाठी हे केले जाते. |
| **नैतिकता आणि घटनात्मक मूल्ये** | एक उत्तम शिक्षण प्रणाली ही तत्त्वे, नीतिमूल्ये आणि घटनात्म मूल्यांवर आधारित असते जी सहानुभूती, इतरांचा आदर, स्वच्छता, सौजन्य, लोकशाहीची भावना, सार्वजनिक मालमत्तेचा आदर, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्वातंत्र्य, जबाबदारी, बहुविधता, समानता आणि न्याय यावर भर देतात. |
| **डिजिटल शिक्षण साक्षरता** | एन.ई.पी २०२० सर्व लोकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या फायद्यांची आवश्यकता अधोरेखित करते. भविष्यातील शैक्षणिक क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म आणि माहिती सप्रेषण तंत्रज्ञान (आयसीटी)-आधारित शैक्षणिक उपक्रम आवश्यक आहेत आणि त्यांचा विस्तार करणे आवश्यक आहे. |
| **व्यावसायिकतेची ओळख आणि कौशल्ये** | एन.ई.पी २०२० व्यावसायिक आणि शैक्षणिक शिक्षण यांच्यात कठोर विभाजन न करण्याच्या संकल्पनेला प्रोत्साहन देते. विद्यार्थ्यांना विशेषत: त्यांच्या आवडीप्रमाणे विषय निवडण्याचा पर्याय मिळेल, जेणेकरून ते भविष्यातील त्यांचा मार्ग स्वतः निश्चित करू शकतील. आंतरवासिता (इंटर्नशिपच्या) संधींद्वारे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील व्यावसायिक तज्ज्ञांसोबत जसे सुतार, माळी, कुंभार आणि कलाकार इ. सोबत संवाद साधण्याची संधी मिळते. |
| **कला-एकात्मिक शिक्षण** | शैक्षणिक पद्धतींमध्ये कला-एकात्मिक शिक्षणाचा समावेश केल्याने मुलांसाठी शिक्षण आनंददायक बनेल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण तयार होईल. भारतीय कला आणि संस्कृतीचा समावेश केल्याने शिक्षणात भारतीय तत्वज्ञान आणि मूल्ये रुजतील आणि शिक्षण व संस्कृती यांच्यातील बंध अधिक मजबूत होईल, जो कोणत्याही देशाच्या शिक्षण प्रणालीचा सर्वात महत्वाचा पैलू आहे. |
| **खेळ -एकात्मिक शिक्षण** | एन.ई.पी २०२० "देशी खेळांचा समावेश असलेल्या क्रीडा-एकात्मिक शैक्षणिक दृष्टिकोना" ची देखील शिफारस करते. यामुळे विद्यार्थ्यांना सहयोग, स्वयंस्फूर्तता, आत्मनिर्भयता, शिस्त, कार्यसंघ भावना आणि जबाबदारी यासारखी कौशल्ये विकसित करण्यास मदत होईल. |
| **समुदाय प्रतिबद्धता** | विविध अभ्यासांनी प्रभावी शिक्षणासाठी मुलाच्या शिक्षण प्रक्रियेत समुदायाच्या सहभागास समर्थन दिले आहे. विविध मार्गांनी समाजाचा अर्थपूर्ण सहभाग सांस्कृतिक आदराची भावना विकसित करेल आणि मुलांमध्ये सामाजिक-भावनिक शिक्षण वाढवेल. यामुळे त्यांना शाळेबाहेरील समाजाची गतिशीलता शिकण्यासही मदत होईल. |

| | |
|---|---|
| **२१ व्या शतकातील कौशल्ये** | हे विकसित होणाऱ्या समाजात आणि जगात यशस्वी होण्यासाठी, व्यक्तींसाठी आवश्यक असलेल्या विस्तृत कौशल्यांचा किंवा क्षमतांचा समूह दर्शवते. या कौशल्यांमध्ये सर्जनशीलता, डिजिटल साक्षरता, समस्या सोडवणे, संवाद, नावीन्य आणि जुळवून घेण्याची क्षमता समाविष्ट आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर, हे कौशल्य आता जागतिक नागरिक होणाऱ्या / बनणाऱ्या व्यक्तींसाठी आवश्यक झाले आहेत. |
| **३६० डीग्री मूल्यमापन करणे( सर्वंकष मूल्यमापन) करणे** | एन.ई.पी २०२० मुलांसाठी ३६०- अंशांचे बहुआयामी मूल्यांकन सुचविते. मुलांचे मूल्यांकन शिक्षक, पालक, सहकारी आणि स्व-मूल्यांकनाद्वारे समग्रपणे केले जावे. यामध्ये ज्ञानात्मक (कॉग्निटिव्ह), भावनात्मक (अफेक्टिव्ह) आणि क्रियात्मक (साइकोमोटर) विकासाचे सर्व पैलू समाविष्ट केले जातील. |
| **शिक्षकांचे मानसिक स्वास्थ्य** | आत्ताच्या शैक्षणिक परिस्थितीत शिक्षक हे मध्यवर्ती भूमिका बजावतात आणि त्यांचे कार्य अत्यंत आव्हानात्मक बनले आहे. भावनिक ताण, कार्य-जीवन समतोल आणि कामगिरीचा दबाव हे शालेय शिक्षकांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे काही घटक आहेत. म्हणून, शाळांमध्ये सहकार्यात्मक आणि आरोग्यदायी अध्ययन वातावरण तयार करण्यासाठी शिक्षकांच्या मानसिक आरोग्याचा मुद्दा लक्षात घेणे सुद्धा आवश्यक आहे. |

## ४.६ सदुपदेशन परस्परसंवाद

सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही यांच्यातील संबंधात संवादाला महत्वाची भूमिका असते. मात्र, कालांतराने हे नाते विकसित होते. संपूर्ण संवादादरम्यान, सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही यांच्यातील हे नाते स्थिर आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. तसेच, त्यांनी सदुपदेशन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी निवडलेल्या कारणांवर विचार करणे गरजेचे आहे. सदुपदेशन कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही यांच्या संवादावर अवलंबून असते. या परस्परसंवादामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे:

अ. विश्वास निर्माण करणे आणि जवळीक वाढवणे

ब. ध्येय निश्चित करण्यासाठी सहकार्यात्मक प्रयत्न

स. सदुपदेशक आणि सदुपदेशग्रही यांच्या वारंवार भेटी

ड. एकमेकांची स्तुति व प्रबलन

इ. वैयक्तिक व व्यावसायिक विकास

फ. सहाय्यकारी मार्गदर्शन व अभिप्राय

# प्रकरण ५

# सदुपदेशन कार्यक्रमाचे घटक



# प्रकरण ५ : सदुपदेशन कार्यक्रमाचे घटक

एका सदुपदेशन कार्यक्रमाचे विकसन करतांना अनेक पैलू विचारात घेतल्याने तो एक सूक्ष्म संरचना भासण्याची शक्यता आहे. खालील बाबी सदुपदेशन कार्यक्रमाची प्रभावी रचना आणि अंमलबजावणी करण्यात मदत करू शकतात:

## ५.१. कार्यक्रम आकृतिबंध आणि नियोजन

अ. ध्येय गट (सदुपदेशनग्रही)

ब. सदुपदेशन कार्यक्रमाचे स्वरूप

स. ऑनबोर्डिंगसाठी संभाव्य सदुपदेशक

ड. सर्व भागधारकांसाठी दृष्टी (व्हिजन), उद्दिष्टे आणि अपेक्षित अध्ययन निष्पत्ती (सदुपदेशक, सदुपदेशनग्रही, प्रशासक इ.)

इ. सत्रांचा कालावधी आणि वारंवारता

फ. सदुपदेशन संवादाची पद्धत

ग. कार्यक्रमाशी संबंधित माहितीचा प्रसार


ह. पर्यवेक्षण आणि मूल्यमापन

ई. अभिप्राय आणि पाठपुरावा

### ५.१.१ सदुपदेशकाची प्रगती

सदुपदेशन कार्यक्रमात केवळ सदुपदेशक आणि सदुपदेशन घेणारा यांच्यातील नातेच नसते तर सदुपदेशनग्रही सतत प्रणालीला उपलब्ध राहील याची खात्रीदेखील केली जाते, विशिष्ट गोष्टी त्यातील हेरण्यासाठी मार्गदर्शन प्रणालीची रचना शाश्वतपणास समर्थन देणारी असावी व प्रणाली सतत कार्यरत ठेवण्यासाठी नेहमी बाह्य स्त्रोतांवर अवलंबून राहू नये. उदाहरणार्थ, सदुपदेशकाने स्वत: एका विशिष्ट स्तराचे प्रशिक्षण घेतल्यानंतर तो नवीन सदुपदेशकांना प्रशिक्षण देऊ शकतो. खाली चार-चरणीय प्रक्रियेचे एक उदाहरण दिले आहे.

सदुपदेशन कार्यक्रमाची प्रगती सदुपदेशन नातेसंबंधाची प्रगती लक्षात घेऊन तयार केली गेली पाहिजे.




**आकृती ५.१ सदुपदेशकाची प्रगती**

## ५.२ कार्यक्रमाचे व्यवस्थापन

सदुपदेशन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, कार्यक्रम व्यवस्थापन पथक (Program Management Unit PMU) किंवा प्रशासकांची टीम स्थापन केली जाऊ शकते ज्यामध्ये खालील घटकांचा समावेश असू शकतो:

अ. सल्लागार गट स्थापन करणे

ब. कार्यक्रम व्यवस्थापित करण्यासाठी एक प्रणाली

स. विकास योजना आणि संसाधन डिझाइन

ड.कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करण्यासाठी एक प्रणाली

इ. भागधारक, संस्था आणि कार्यक्रमासाठी अभिप्राय यंत्रणा

फ. मानव संसाधन विकासासाठी धोरणे

ग. प्रभावी जनसंपर्क आणि संवादाचे प्रयत्न

ह. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी बजेटची तरतूद

## ५.३ कार्यक्रम संचालन

संचालनात्मक कार्ये लक्षात ठेवा:

अ. सदुपदेशक, सदुपदेशनग्रही, कार्यक्रम कर्मचारी आणि स्वयंसेवक यांचा एक समुह तयार करणे, जर असेल तर

ब. संभाव्य सदुपदेकांची तपासणी करणे आणि सदुपदेशनग्रहींचे प्रमाणीकरण

स. सदुपदेशक, सदुपदेशनग्रही, आणि कार्यक्रम कर्मचाऱ्यांसाठी उदबोधन आणि प्रशिक्षण प्रदान करणे.

ड. सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही आखणी

इ. प्रस्थापित मापदंडांतर्गत सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रहींसाठी उपक्रम आणि सत्रांचे नियोजन

फ. सदुपदेशन कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करण्यासाठी सहाय्यक यंत्रणा

ग. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान सहभागी झालेल्यांचे योगदान हेरणे

ह. सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी सहाय्य करणे.

### ५.३ .१ भूमिका आणि जबाबदाऱ्या

सदुपदेशन कार्यक्रमाच्या विविध भागधारकांच्या सूचक भूमिका आणि जबाबदाऱ्या खाली दिल्या आहेत:

**सारणी ५.१: भागधारक आणि जबाबदाऱ्या**

| भागधारक | जबाबदाऱ्या |
|---|---|
| वरिष्ठ अधिकारी/पीएमयू | अ. सदुपदेशन प्रशिक्षणासाठी कार्यक्रम, रोडमॅप आणि अभ्यासक्रमाची रचना करा<br>ब. सदुपदेशक निवडा<br>क. सदुपदेशकांची क्षमता वाढवा.<br>ड. सतत क्षमता विकासासाठी सदुपदेशकांचे समर्थन करा.<br>इ. मनोबल उंच ठेवण्यासाठी प्रख्यात वक्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचे विचार रेकॉर्ड करण्यासाठी आणि सामायिक करण्यासाठी आमंत्रित करा<br>फ. कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी आणि कार्यवाही सुनिश्चित करा<br>ग. कार्यक्रमाचे पर्यवेक्षण आणि मूल्यांकन करा |
| सदुपदेशक | अ. सदुपदेशक प्रमाणपत्र कार्यक्रम पूर्ण करा.<br>ब. इतर शिक्षकांसाठी सदुपदेशन संरचना आणि सुविधा यांचे आयोजन आणि संचालन करा.<br>स. सदुपदेशनग्रहींकडून त्यांच्या मार्गदर्शन कौशल्यांवर सूचना आणि अभिप्राय घ्या.<br>ड. सतत क्षमता विकसित करण्यासाठी प्रशिक्षण/कार्यशाळेला उपस्थित राहा. |
| सदुपदेशनग्रही | अ. सदुपदेशन आराखडयांना उपस्थित रहा.<br>ब. सतत व्यावसायिक विकासासाठी शिका, सामायिक करा, सोडवा आणि जोडलेले रहा. |

## ५.३.२ विविध टप्प्यांमध्ये सदुपदेशन कार्यक्रमाच्या संचालनासाठी शिफारसी

### क. कार्यक्रमाची अंमलबजावणी

अ. देश/राज्य/प्रणालीमधील व्यावसायिकांसाठी सदुपदेशक बनण्यासाठी निवड प्रक्रिया तयार करा

आ. सदुपदेशक म्हणून नावनोंदणीसाठी निकष जाहीर करा

इ. प्रणालीतील भागधारकांसाठी निकष आणि निवड वेळापत्रक जाहीर करा.

### ख. सदुपदेशक निवड प्रक्रिया (परिशिष्ट II पहा)

सदुपदेशक निवड प्रक्रियेचे खालील दोन टप्पे लागू केले जाऊ शकतात:

अ. स्टेज 1: लोकसंख्याशास्त्रीय तपशील विचारणारा अर्ज आणि ऑनलाइन शिक्षण सेटिंगमधील आव्हाने सोडवण्याच्या अर्जदाराच्या क्षमतेचे मूल्यांकन करणारा व्यक्ती अभ्यास (केस स्टडी). निवडलेले अर्जदार स्टेज 2 वर जातील.

आ. टप्पा 2: संवाद कौशल्य, प्रेरणा देण्याची क्षमता, कार्यक्षेत्राचे ज्ञान इत्यादींचे मूल्यांकन करण्यासाठी संवाद/मुलाखत. मुलाखत प्रक्रिया तज्ज्ञांच्या समितीद्वारे आयोजित केली जाईल. निवडलेल्या अर्जदारांना सदुपदेशन मंचावर सदुपदेशक म्हणून नियुक्त केले जाईल.

विशिष्ट कार्यक्षेत्रामधील नामांकित आणि उत्कृष्ट व्यावसायिकांना राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे द्वारे थेट राष्ट्रीय सदुपदेशन अभियानासाठी नियुक्त केले जाईल.

### ग. सदुपदेशक क्षमता विकसन

अ. सदुपदेशकांसाठी कार्यशाळांची रचना करा ज्याचा उद्देश संकल्पना, कौशल्ये आणि तंत्रज्ञानाविषयी ज्ञान निर्मिती करणे असेल, हे त्यांना प्रभावीपणे मार्गदर्शन करण्यासाठी आवश्यक आहे उदा. सुलभीकरण कौशल्ये, चौकस प्रश्न विचारणे, सदुपदेशनग्रहींच्या गटामध्ये वातावरण निर्मिती करत संस्कृती निर्माण करणे इ.

आ. सदुपदेशन सत्रे सुरू होण्यापूर्वी क्षेत्रातील तज्ज्ञांना आमंत्रित करून कार्यशाळा आयोजित कराव्यात, ज्यामध्ये माहितीपट आणि नियोजित उपक्रमांद्वारे दिशानिर्देश/क्षमता वाढविण्यावर भर द्यावा.

### घ. सदुपदेशक नियुक्ती (ऑनबोर्डिंग) प्रक्रिया

अ. सदुपदेशकांना सदुपदेशन प्लॅटफॉर्म ( एनएमएम पोर्टल/मोबाईल ॲप्लिकेशन) वर नियुक्त करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करा आणि सामायिक (शेअर) करा.

आ. सदुपदेशक त्यांचे प्रोफाइल तयार करतील आणि आवश्यक माहिती प्रदान करतील

### ङ सदुपदेशनग्रही नियुक्ती (ऑनबोर्डिंग) प्रक्रिया

अ. सदुपदेशन मंचावर सदुपदेशनग्रहींची नियुक्त (ऑनबोर्डिंग) करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करा आणि शेअर करा

आ. सदुपदेशनग्रहींच्या नियुक्त (ऑनबोर्डिंग) प्रक्रियेचा मागोवा घेण्यासाठी नोंदी ठेवा

### च. सदुपदेशन परस्परसंवाद

अ. सदुपदेशक मंचावर गट मार्गदर्शन सत्रांचे वेळापत्रक तयार करू शकतात आणि त्यांचे संचालन करू शकतात.

आ. सदुपदेशनग्रही मंचावर गट मार्गदर्शन सत्रे आणि सदुपदेशक शोधू शकतात आणि सत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करू शकतात

इ. सदुपदेशनग्रही संबंधित क्षेत्रातील सदुपदेशकापर्यंत त्याच्या प्रश्नांसह व्यक्तिगतपणे संपर्क साधू शकतात. सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही सदुपदेशन परस्परसंवादाची वेळ आणि रचना याबाबत संयुक्तपणे निर्णय घेऊ शकतात.

ई. सदुपदेशनग्रही सदुपदेशकांना श्रेणी आणि अभिप्राय देऊ शकतात

*नियुक्ती किंवा सदुपदेशन परस्परसंवादासंदर्भात कोणत्याही तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यात आयटी टीम समर्थन करेल.*

### छ. पर्यवेक्षण आणि विश्लेषण

अ. मंचावर सदुपदेशन करण्याच्या प्रतिबद्धतेचा मागोवा घ्या आणि आवश्यकतेनुसार मासिक/त्रैमासिक अहवाल तयार करा

आ. सदुपदेशन कार्यक्रमाचे विश्लेषण करण्यासाठी सर्व अहवालांचा मागोवा घेऊन त्यांचे संकलन करा आणि आवश्यकतेनुसार सक्षम उपाय सुचवा.

## ५.४ कार्यक्रमाचे मूल्यमापन

सदुपदेशन कार्यक्रमाची निरंतर गुणवत्ता साधण्यासाठी त्याच्या मूल्यमापनासाठी खालील गोष्टी आवश्यक आहेत:

अ. कार्यक्रमाची प्रगती मोजण्यासाठी एक योजना

आ. कार्यक्रमाची अपेक्षित निष्पत्ती मोजण्यासाठी एक प्रक्रिया

इ. कार्यक्रमाचे मूल्यांकन, निष्कर्ष आणि प्रसार यावर सर्वसमावेशक अहवाल.

कार्यक्रमाचे यश तीन प्रमाणकांचे मूल्यांकन करून मोजले जाऊ शकते:




आकृती ५.२: मार्गदर्शनासाठी मूल्यांकन प्रमाणक

**क. प्रवेश पध्दती:** हा सदुपदेशन कार्यक्रम त्याच्या सर्व आवश्यक भागधारक, ज्यांना सेवा देण्याचा हेतू होता, त्यांना समाविष्ट करतो का?

कार्यक्रमाचे मूल्यमापन करताना त्याची प्रवेशयोग्यता ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. संवर्गाच्या सर्व सदस्यांना सदुपदेशन उपलब्ध असणे आवश्यक आहे कारण ते योजक आणि सर्वसमावेशक व्यावसायिक विकासात रमण्याची संधी देते. या निर्देशकाचे मूल्यांकन भागधारकांच्या विद्यमान डेटाबेसमधील व्याप्ती पाहून केले जावे. त्यात सर्वसमावेशकता, विविधता, मापनक्षमता, भाषा आणि प्रवेश यासारख्या महत्त्वाच्या घटकांचा देखील समावेश असावा, जे विविध संदर्भ असलेल्या देशात यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक आहेत.

हा कार्यक्रम भागधारकांसाठी सदुपदेशन आवश्यक किंवा निवडण्याची संधी बनवू शकतो, परंतु हा प्रश्न विचारणे महत्त्वाचे ठरेल-"कार्यक्रमात सर्वाधिक प्रवेश घेणाऱ्या भागधारकांना सदुपदेशन केल्याने फायदा होईल का?" यासाठी सदुपदेशन कार्यक्रम निर्देशपत्र आणि निवड-आधारित या दोघांचे मिश्रण असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रणालीमध्ये नवीन पद्धतींचा समावेश करणे आव्हानात्मक आहे आणि उपलब्धता आणि प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी उपाय आवश्यकतेनुसार लागू केले जावेत.

**ख. समाधान:** सदुपदेशक, सदुपदेशनग्रही आणि त्यांच्या संबंधित शाळा/संस्था या कार्यक्रमाबाबत कितपत समाधानी आहेत?

हे मानक सदुपदेशन परस्परसंवादाच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करते. कार्यक्रम भविष्यात चालू ठेवण्यासाठी आणि सूचक व्हावा यासाठी सर्व भागधारकांचे समाधान आवश्यक आहे. सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रहींचे समाधान नियतकालिक सर्वेक्षणाव्दारे मोजले जाऊ शकते ज्यात या कार्यक्रमाने त्यांच्या व्यावसायिक जीवनात किती महत्त्वाची भर घातली आणि त्यांना त्यांच्या गुंतवलेल्या वेळेवर मिळणारा परतावा याबद्दल विचारता येते. भागधारकांचे समाधान दोन स्वतंत्र मानके वापरून मोजले जाऊ शकते -

क. सुसूत्र परस्पर संवादंची गुणवत्ता - सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही सदुपदेशनादरम्यान संभाषणांच्या संरचनेचा आनंद घेत आहेत आणि या उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त वेळ घालवण्यासाठी दोन्ही बाजूंनी पुरेसा सहभाग आहे हे सुनिश्चित करण्यासाठी आहे.

ख. परस्परसंवादांद्वारे वितरित केलेल्या सामग्रीची गुणवत्ता - हे सुनिश्चित करण्यासाठी आहे की या परस्परसंवादांदरम्यान वितरित सामग्री भागधारकांच्या व्यावसायिक जीवनात मूल्य वाढवते. भागधारकांना आपल्या सध्याच्या पायाभूत माहितीशी योग्यप्रकारे संबंध जोडणे हे पुरेसे परिचित असले पाहिजे आणि त्याचे चांगले आकलन होणे आवश्यक आहे परंतू त्यांच्या विचारांना नवीन दिशेकडे प्रवृत्त करणे तसे आव्हानात्मक आहे.

**ग. प्रभाव:** कार्यक्रमाचा शाळा/संस्थेवर काय परिणाम होतो?

हे मानक सदुपदेशन प्रणालीच्या प्रभावाचे मूल्यांकन करते आणि कदाचित मोजणे सर्वात कठीण आहे. सदुपदेशन कार्यक्रमाच्या उद्देशानुसार, विद्यार्थ्यांवरील परिणाम, शालेय संस्कृतीतील बदल इत्यादींचे मूल्यांकन करावे लागेल. मापनाचे हे दीर्घकालीन मानक आहे आणि कार्यक्रमाच्या सुरुवातीच्या टप्प्यात ते व्यवहार्य नसले तरी दैनंदिन पद्धतींवरील परिणामांवरील अभिप्राय उद्दिष्टे साध्य करण्याच्या मार्गावर राहण्यासाठी कार्यक्रमात बदल करण्यास मदत करू शकतात.

भविष्यात, कार्यक्रमाचे यश आणि तो सुरू ठेवण्याचा निर्णय हा कार्यक्रमाद्वारे विकसित झालेल्या प्रभावावर आधारित असावा. जरी हे सदुपदेशन कार्यक्रमात घालवलेल्या विशिष्ट कालावधीनंतरच मोजले जाऊ शकते, तरी हे कार्यक्रमाच्या यशाचे सर्वात महत्वाचे सूचक आहे. शालेय प्रगती, नवीन कार्य संस्कृतीसाठी संक्रमणाची तयारी, सुधारित अध्ययन निष्पत्ती इत्यादींचा परिणाम योग्य यश निर्देशक वापरून मोजणे आणि कार्यक्रमात वारंवार पुरेसे बदल करणे आवश्यक आहे. येथे काही उदाहरणे आहेतः

**सारणी ५.२: उद्दिष्ट आणि प्रभाव निर्देशक**

| सदुपदेशन कार्यक्रमाचे उद्दिष्ट | प्रभाव निर्देशक जे वापरले जाऊ शकतात |
|---|---|
| सेवापूर्व शिक्षकांचे कार्यशक्तीत संक्रमण सुलभ करण्यासाठी, सेवा-पूर्व शिक्षकांना सेवांतर्गत शिक्षकांकडून मार्गदर्शन केले जाईल. | अ. कर्मचारी वर्गात सामील झाल्या कारणाने शिक्षकांच्या समाधानाच्या टक्केवारीत वाढ होते.<br>ब. नवीन शिक्षकांच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीच्या टक्केवारीत वाढ होते.<br>स. नवीन शिक्षकांच्या विद्यार्थ्यांच्या समाधानाच्या पातळीच्या टक्केवारीत वाढ होते.<br>ड. सेवांतर्गत शिक्षक-सदुपदेशकांच्या कामगिरी निर्देशकांमध्ये टक्केवारीत वाढ होते. |
| विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान वाढविण्यासाठी, एका केंद्रामधील शिक्षक समवयस्क-मार्गदर्शक मंडळे तयार करतात. | अ. विद्यार्थ्यांच्या मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान मूल्यांकन कामगिरीच्या टक्केवारीत वाढ होते.<br>ब. योग्य शिक्षण-शिक्षण साहित्याचा वापर आणि वर्ग निरीक्षणादरम्यान नोंदवलेल्या कामगिरी तील टक्केवारीत वाढ.<br>स. शिक्षकांच्या समाधान आणि समाजभावनेतील टक्केवारीत वाढ . |

एन.एम.एम. हे एस डी.जी. ४ (दर्जेदार शिक्षण) पासून प्रेरित असले तरी ते एस. डी. जी. च्या अंमलबजावणीच्या कालमर्यादेपुरते मर्यादित नाही. प्रणालीमध्ये सदुपदेशनासाठी सतत व निरंतर प्रक्रियांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने हे अभियान सुरू केले जात आहे. वर सूचीबद्ध केलेले प्रभाव निर्देशके वेळोवेळी सदुपदेशन कार्यक्रमाची उद्दिष्टे आणि ध्येये यांमध्ये सुधारणा करण्यासाठी उपयुक्त ठरतील.

बदल घडवून आणण्यासाठी सकारात्मक मजबुतीकरण वापरण्याच्या प्रयत्नात, सकारात्मक परिणाम घडवणाऱ्या सर्व भागधारकांच्या कार्याला पुरस्कृत केले पाहिजे आणि प्रोत्साहन दिले पाहिजे. हे सदुपदेशन कार्यक्रमाच्या इतर फायद्यांसोबतच बदल आणि सकारात्मक परिणामांवर सतत लक्ष केंद्रित करेल याची खात्री होईल. शेवटी, भारतातील शिक्षणात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या क्षमतेनुसार सदुपदेशन कार्यक्रमाचे मूल्यमापन केले पाहिजे.

## ५.५. संस्थात्मक रचना

संस्थात्मक, संघटनात्मक आणि वैयक्तिक व्यावसायिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सदुपदेशन हा एक उत्तम मार्ग आहे. हे प्रणालीच्या सामूहिक मूल्य वाढविण्यासाठी परिसंस्थेमधील विद्यमान संसाधनांचा वापर सुधारणा करण्यासाठी आणि शिक्षण प्रणालीच्या स्तरांवर एक आवश्यक कृतीकार्यक्रम म्हणून समजले जावे.

ही एक अत्यांवश्यक निरंतर चालणारी प्रक्रिया असावी जी सर्व भागधारकांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारांमध्ये शाश्वतपणे समाविष्ट करत येईल.

एखादा सदुपदेशन कार्यक्रम सुरुवातीस भागधारकांना खूप समाधान मिळवून देऊ शकतो कारण त्याच्या लाभार्थ्यांमध्ये सौहार्दाची भावना असते. तथापि, सदुपदेशन कार्यक्रम राबविण्यासाठी सदुपदेशक, सदुपदेशनग्रही आणि प्रशासन यांना खूप वेळ खर्च करावा लागतो आणि मेहनत घ्यावी लागते. भविष्यात असा कार्यक्रम चालू ठेवण्यासाठी, सदुपदेशन कार्यक्रमाचे संस्थानीकरण करणे आवश्यक आहे.

संस्थात्मकीकरण म्हणजे एखाद्या संस्थेत किंवा संस्कृतीमध्ये एक परंपरा किंवा आदर्श म्हणून काहीतरी स्थापित करणे. सदुपदेशन कार्यक्रमातील सर्व संरचना संस्थात्मक अंमल आणि फायदे यांच्याशी जोडल्या गेल्या पाहिजेत जेणेकरून ते लक्षणीय प्रमाणात, शाश्वतपणे कार्य करेल. कोणत्याही स्तरावर मार्गदर्शन यशस्वीपणे संस्थात्मक करण्याचे दोन मार्ग आहेत.

## ५.६ प्रोत्साहन

या कार्यक्रमात सहभागासाठी गैर-मौद्रिक प्रोत्साहन दिले जाते जे सदुपदेशक, सदुपदेशनग्रही आणि त्यांच्याशी संबंधित संस्थांना शिक्षण व्यवस्थेतील विद्यमान संरचनांमध्ये भरभराट होण्यास मदत करतात.

सदुपदेशक किंवा सदुपदेशनग्रही यांना कसे प्रोत्साहन दिले जाऊ शकते याची येथे काही उदाहरणे आहेत:

**सारणी ५.३ : प्रोत्साहनाचे प्रकार**

| उदाहरण क्र. | प्रोत्साहनाचे प्रकार | तपशील |
|---|---|---|
| उदाहरण १ | सदुपदेशकास संधी | अ. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सदुपदेशकास प्रमुख संस्थेकडून विशेष नेतृत्व विकास अभ्यासक्रमात प्रवेश करण्याची संधी.<br>आ. एनएमएमला शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानके [नॅशनल प्रोफेशनल स्टँडड्र्स फॉर टीचर्स (एनपीएसटी)] शी जोडले जाईल. |
| उदाहरण २ | सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सदुपदेशकास ओळखणे | अ. प्रशंसा प्रमाणपत्रे<br>आ. स्पॉटलाइट्स उदा. वेबसाइटवर वैशिष्ट्यीकृत, सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सदुपदेशकांच्या कथा इ.<br>इ. एनएमएम वर वर्षअखेरीच्या सेमिनारमध्ये सर्वोत्तम पद्धती प्रदर्शित करण्याची संधी |

सदुपदेशनग्रहींची उत्कृष्ट कामगिरी हेरली ही जाईल आणि प्रशंसा प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

## ५.७. सदुपदेशन कार्यक्रमासाठी आव्हाने

सदुपदेशन कार्यक्रम हा काही अडथळयांपासून मुक्त नाही. सदुपदेशन कार्यक्रमाची रचना करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे हे स्वतःच एक आव्हान असू शकते. तथापि, जर आपल्याला या आव्हानांची जाणीव असेल, तर त्यांना सोप्या मार्गांनी संबोधित केले जाऊ शकते.

### ५.७.१ विसंगत अपेक्षा

कोणत्याही सदुपदेशन कार्यक्रमाच्या रचनेतील एक आवश्यक घटक म्हणजे उद्दिष्टे निश्चित करणे आणि सर्व सहभागी भागधारकांसाठी असणा-या स्पष्ट अपेक्षा. उद्दिष्टे निश्चित करणे आणि अपेक्षा संरेखित करणे हे एक आव्हान बनू शकते, विशेषत: जेव्हा सदुपदेशक किंवा सदुपदेशनग्रही हे सदुपदेशनामध्ये काय साध्य करू इच्छितात याबद्दल अस्पष्ट असतात.

हा अडथळा पूर्णपणे टाळण्यासाठी, संपूर्ण सदुपदेशन कार्यक्रमाकडून असणा-या अपेक्षा सतत व्यक्त करणे आणि प्रत्येकजण संरेखित आहे याची खात्री करण्यासाठी स्पॉट चेक सादर करणे आवश्यक आहे.

### ५.७.२ उदासीन वा वंचित राहिलेले सदुपदेशनग्रही

सदुपदेशनग्रहीने सदुपदेशन कार्यक्रमामध्ये सहभागी होणे आणि त्याचा जास्तीत जास्त फायदा घेणे महत्त्वाचे असले तरी, त्यांना नातेसंबंधात राहण्यासाठी प्रोत्साहित करणे देखील महत्त्वाचे आहे. सदुपदेशनग्रहीच्या उदासीन वा वंचित असण्याला कारणीभूत ठरणारी अनेक मूलभूत कारणे असू शकतात. हे सदुपदेशक-सदुपदेशनग्रही प्रतिबद्धतेच्या गुणवत्तेवर परिणाम करते आणि वेगवेगळया अभिनेत्यांनी केलेल्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष करते. अशा उदासीन वा वंचित असणा-या सदुपदेशनग्रहींना सदुपदेशन कार्यक्रमातून जास्तीत जास्त लाभ मिळविण्यासाठी सदुपदेशकाने प्रेरित आणि प्रोत्साहित केले पाहिजे.

### ५.७.३ सदुपदेशकांमध्ये प्रोत्साहनाचा अभाव

कार्यक्रमासाठी सदुपदेशकांची योग्य संख्या निवडणे हे सर्वात सामान्य आव्हानांपैकी एक आहे जरी ती आव्हाने महत्त्वाची असली तरी, सदुपदेशकांची प्रेरणा आणि तज्ज्ञता देखील तितकीच महत्त्वाची आहे. प्रेरणेशिवाय सदुपदेशक कमी गुंतलेले आणि कमी प्रभावी होतात. यामुळे सदुपदेशनाचे नाते असफल होते आणि सदुपदेशनग्रहीसाठी खराब निष्पत्ती ठरते.

त्यामुळे कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच योग्य सदुपदेशक निवडणे महत्त्वाचे ठरते. यासह, सदुपदेशकांना योग्य प्रशिक्षण देणे आणि संपूर्ण नातेसंबंधात त्यांच्याशी संवाद साधणे महत्वाचे आहे.

### ५.७.४ अवाजवी किंवा अपुरी रचना

सदुपदेशनग्रहीच्या वैयक्तिक गरजा ओळखणे महत्वाचे आहे. काही सदुपदेशनग्रहींना आणि सदुपदेशकांना विविध साधने आणि संसाधनांचा वापर करणे आवडेल, तर इतरांना त्यांचा वापर करण्याचे दडपण येईल. सदुपदेशन कार्यक्रमाची रचना अशी असावी की सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही त्यांच्या गरजा आणि सोयीप्रमाणे संसाधने वापरू शकतील.

### ५.७.५ दुर्लक्षित तपास मुद्दे

मार्गदर्शन कार्यक्रमाचे स्पष्ट तपास मुद्दे सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रहींना कार्यक्रमाची सुरुवात, मध्य आणि समाप्तीबद्दल मार्गदर्शन करतात. हे सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही या दोघांनाही समाधान देते. उदाहरणार्थ, सदुपदेशक नातेसंबंध प्रभावीपणे बंद न केल्यास सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही नंतर असमाधानी राहू शकतात, गोंधळलेले भासू शकतात आणि अध्ययनानंतर ही पुढे कसे जायचे याबद्दल अनिश्चित असतात.

### ५.७.६ सदुपदेशनाबाबतचे गैरसमज

सदुपदेशनाबाबत काही सामान्य गैरसमज अडथळे निर्माण करू शकतात. सदुपदेशनाबद्दल काही व्यापक समज अडथळे आणू शकतात आणि सहभागींना अनुभवाचा अधिकाधिक फायदा घेण्यापासून परावृत्त करू शकतात. अनेक सामान्य मिथकांमध्ये हे समाविष्ट आहे:

- “सदुपदेशन ही वेळखाऊ प्रक्रिया आहे”
- “सदुपदेशनाला कारकीर्द किंवा वैयक्तिक जीवनामध्ये काहीही महत्त्व नाही”
- सदुपदेशनाचे फायदे फक्त सदुपदेशनग्रहींनाच मिळतात आणि सदुपदेशकाला नाही”

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्पष्ट अपेक्षा, चांगल्या प्रकारे परिभाषित केलेल्या भूमिका, जबाबदाऱ्या आणि परिणाम यांचा समावेश केल्याने या गैरसमजांना संबोधित करण्यात मदत होते. योग्य नियोजन आणि समर्थनासह सदुपदेशन कार्यक्रम दीर्घकाळ सुरू राहू शकतो आणि टिकाऊ परिणाम देऊ शकतो. एकदा कार्यक्रमाने गती घेतल्यावर, सदुपदेशनाची संस्कृती विकसित होते आणि औपचारिक कार्यक्रमांसह अनौपचारिक सदुपदेशनाची भरभराट होते.

### ५.७.७ दुर्गम सदुपदेशन

सदुपदेशनपर संवादांच्या प्रवेशयोग्यतेचा विचार करून कोणत्याही सदुपदेशनाची रचना तयार केली गेली पाहिजे. उदाहरणार्थ, शाळेमध्ये सदुपदेशन वैयक्तिकरित्या आणि निश्चित वारंवारतेवर होऊ शकते

जेणेकरून ते सर्व सदुपदेशक आणि समुपदेशनग्रहींना सहज उपलब्ध होईल. तथापि, देशव्यापी सदुपदेशन कार्यक्रमाला तांत्रिक व्यासपीठासारखी उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मोठ्या पायाभूत सुविधांची आवश्यकता असू शकते. पद्धती आणि माध्यमांची रचना करताना एक बहुविद्याशाखीय दृष्टिकोन वापरून सदुपदेशन अधिक सुलभ केले जाऊ शकते.


## ५.८ तक्रार निवारण यंत्रणा

एनसीटीइद्वारे एनएमएमबाबतच्या तक्रारींना अधिक पारदर्शकतेने व्यवस्थापित करण्यासाठी आणि त्यांचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण समितीची स्थापना केली जाईल. हे सदुपदेशक /विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी योग्य हस्तक्षेप सुरू करण्यात मदत करेल. यामुळे समुपदेशनग्रहींना आणि सदुपदेशकांना त्यांच्या गरजा आणि सूचना शेअर करण्याची संधी मिळेल, ज्यामुळे मार्गदर्शन प्रणाली त्यांच्या गरजांशी अधिक सुसंगत होईल.

NATIONAL MISSION FOR MENTORING

# प्रकरण ६

# राष्ट्रीय सदुपदेशन पायाभूत सुविधा



# प्रकरण ६: राष्ट्रीय सदुपदेशन पायाभूत सुविधा

## ६.१ प्रस्तावना

एनएमएमचे उद्दिष्ट हे सदुपदेशन विस्तृत प्रमाणावर सुस्थापित करणे आणि हे तंत्रज्ञान सक्षम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्या, विविध विस्कळीत, अपु-या आणि तुटक सदुपदेशन उपाययोजना आहेत कारण सदुपदेशन उपाय/ प्रणालीच्या वितरणासाठी अजून ही कोणत्या ही प्रकारच्या नियमावलीचा मसूदा परिभाषित केलेला नाही. सदुपदेशनग्रही विविध वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करत सदुपदेशकांना शोधत असतात. बेकन डीएसईपी प्रोटोकॉलवर अंमलात आणलेल्या संयुक्त सदुपदेशन प्रणालीला [युनिफाइड मेंटरिंग इंटरफेस (यूएमआय)] परिभाषित करून आणि सक्षम करून एनएमआय या कमतरतेवर मात करण्याचा प्रयत्न करते. युएमआयचे उद्दीष्ट विविध सदुपदेशन सेवा आणि उपायांचे संलग्नीकरण सक्षम करणे आहे, ज्यामुळे मुक्त मसुदा / तपशील आणि प्रणालीच्या माध्यमातून विविध सेवांमध्ये सदुपदेशक आणि सदुपदेशन कार्यक्रमाचा शोध घेण्यासाठी उघडले जातील. वातावरणाला चालना देणे आवश्यक आहे जेणेकरून नवोपक्रम, विविधता आणि संदर्भनिर्मिती करणे शक्य होईल. युनिफाइड मेंटरिंग इंटरफेस (UMI) युनिफाइड मेंटरिंग नेटवर्क (UMN) च्या निर्मितीला सक्षम करेल, जिथे विविध प्रणालीचे भागधारक सदुपदेशनातील केसेस्साठी उपायांची निर्मिती व वापर करू शकतील तसेच या उपाय वा सेवा विस्तारित करू शकतील.

सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही या दोघांच्या वेगवेगळया संदर्भात मार्गदर्शक सेवा आणि उपाययोजनांचा अवलंब करणे सुलभ करण्याचे एनएमआयचे उद्दिष्ट आहे. या वैशिष्ट्यांचा त्याच्या डिझाइनच्या प्रत्येक टप्प्यावर त्याच्या तत्त्वांसह आणि तंत्रज्ञानाच्या घटकांसह बळकटीकरण केले जाते.

## ६.२ डिझाइन तत्त्वे

या विभागात, मूलभूत डिझाइन तत्त्वे आणि सर्वोत्तम पद्धती यांची रूपरेषा देऊन एनएमआयच्या डिजिटल पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केले गेले आहे:




आकृती ६.१: राष्ट्रीय मार्गदर्शन पायाभूत सुविधांची डिझाइन तत्त्वे

**अ. सूक्ष्मसेवा स्थापना:** श्रेणीकरण आणि विविधता यातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी, आवश्यकता आणि परिस्थिती यानुसार प्रमाणसाधक सेवा संकलित व असंकलित केल्या जाऊ शकतात. सूक्ष्मसेवा ज्या बदलत्या गरजा आणि संदर्भांनुसार सुलभपणे जोडल्या गेलेल्या आहेत त्यांव्दारे कार्यक्षमतेच्या उत्क्रांतीला अधिक सक्षम करतात.

**ब. सुरक्षित आणि विश्वसनीय:** सुरक्षा आणि गोपनीयता याबाबत व्यवस्थापन करणे महत्वाचे आहे आणि त्यामुळे ते रचनेचा एक महत्त्वाचा भाग बनते. आपल्या वापरकर्त्यांसाठी डेटा सुरक्षा आणि गोपनीयता सुनिश्चित करताना डेटा सक्षम करण्यासाठी पायाभूत सुविधा तयार केल्या आहेत.

**स. मुक्त मानके:** पायाभूत सुविधांच्या रचनेसाठी खुली मानके आणि इंटरऑपरेबिलिटी/ आंतरसंचालनीयता आवश्यक आहे जेणेकरून ते वेगवेगळया केसेस्मध्ये वापरता येतील यास पुष्टी देतील. एन. एम. आय. हे खुली नियमावली आणि ए. पी. आय. चा वापर करून तयार केले गेले आहे, जे विशिष्ट मंच (प्लॅटफॉर्म), नेटवर्क तंत्रज्ञान किंवा भाषांशी कोणतेही संबंध न ठेवता इंटरऑपरेबिलिटी/ आंतरसंचालनीयता सुनिश्चित करतात. हे इंटरऑपरेबिलिटी/ आंतरसंचालनीयता प्रदान करण्यासाठीच्या मानकांवर आधारित आहे. त्यामुळे मुक्त एपीआय एकत्रितपणे काम करण्यासाठी वैविध्यपूर्ण तंत्रज्ञानावर आधारित तयार केलेल्या विविध मार्गदर्शक उपायांच्या विस्तृत श्रेणीला समर्थन देतील.

**ड. विस्तारक्षम आणि लवचिक:** परिसंस्थेमधील मोठ्या संख्येने वापरकर्त्यांसाठी विस्तारक्षम होण्यासाठी, कार्यांच्या विस्तारक्षमता प्रमाणकीकरण आणि समकक्षता तपासणीव्दारे सुनिश्चित केली जाईल.

**ई. निरीक्षणक्षमता:** पायाभूत सुविधांमध्ये टेलीमेट्रीद्वारे सदुपदेशन परस्परसंवादादरम्यान देवाणघेवाण होणाऱ्या मौल्यवान माहितीची निरीक्षणक्षमता साध्य केली जाईल. सदुपदेशनग्रही / सदुपदेशकांच्या सभोवतालच्या सर्व घटना टिपण्यासाठी आणि त्या वापरण्यासाठी आणि विश्लेषणासाठी उपलब्ध करून देण्यासाठी याची रचना करण्यात आली आहे.

**फ. विश्वसनीय मंच:** या पायाभूत सुविधांचा उद्देश दोन्ही पक्षांसाठी सदुपदेशक व सदुपदेशनग्रही यांच्यासाठी सखोल तसेच उद्देशपूर्ण सदुपदेशन अनुभव प्रदान करणारे विश्वसनीय मंच बनणे हा आहे. हे विश्वसनीय नोंदणी व सदुपदेशकांची मंचावर नियुक्तीबाबत आवश्यक परिश्रम करून अधिकृत व अधिप्रमाणित सदुपदेशक सुनिश्चित केल्याची खात्री करून केली जाते

**ग. विकेंद्रित आणि वितरीत:** नेटवर्कचा भाग असलेल्या वितरित विश्वसनीय संस्था/ कोठारांमधील माहितीची (डेटाची) उपलब्धता आणि देवाणघेवाण करण्यासाठी उपयोजन व उपाय सक्षम करण्यासाठी पायाभूत सुविधांची रचना केली गेली आहे.

**ह. मंच-आधारित विचारसरणी:** पायाभूत सुविधा परिसंस्थेतील भागधारकांना राष्ट्रीय स्तरावर त्यांच्या उपाय/सेवा निर्मिती व विस्तारित करण्याची अनुमती देते.

**इ. एकसंध आणि एकरूप नाही:** पायाभूत सुविधा खुल्या मानकांवर आधारित असतात ज्या एकसंध कार्य अधिक सुलभ करतात आणि विविध उपायांना एकत्रितपणे कार्य करण्यास सक्षम करतात.

**ज. वातावरण प्रणाली सक्षम करणे:** यूएमआय सदुपदेशनाच्या परिसंस्थेला उपाय वा उपयोजनांच्या

भांडारामध्ये उपलब्ध माहितीचा फायदा घेत व वापरकर्त्याला प्रवेशयोग्यतेची एकल विंडो प्रदान करत सक्षम करते.

**क. विस्तारशीलता:** पायाभूत सुविधा अशा प्रकारे तयार केल्या गेल्या आहेत की नवीन क्षमता/घटकांना सहजपणे नेटवर्कमध्ये समाविष्ट करता येईल. विनिर्देशांचे पालन केल्यास नवीन घटकांना नेटवर्कच्या विद्यमान क्षमता आणि फायद्यांचा लाभ घेता येईल.

**ख. रचनेनुसार सर्वसमावेशक:**

**अ. वापरकर्त्यांच्याची पार्श्वभूमी**


पायाभूत सुविधा वापरकर्त्यांच्या संदर्भानुसार आणि विविध गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले उपाय सक्षम करते. उदा., वेगवेगळया मंचावर - फोन, वेब, विविध भाषा इ.

**आ. प्रणाली आणि प्रक्रिया**

आज अस्तित्वात असलेल्या अनुप्रयोग, उपाय आणि सामग्रीसह विविध प्रणाली आणि प्रक्रियांना जोडण्यासाठी आणि त्यांचा लाभ घेण्यासाठी पायाभूत सुविधांची रचना करण्यात आली आहे.

## ६.३ सदुपदेशक-सदुपदेशनग्रही परस्परसंवाद सक्षम करणे


एन. एम. आय. च्या मुख्य उद्दिष्टांपैकी एक म्हणजे सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही यांच्यातील अखंड समकालीन आणि असमकालीन मार्गदर्शन संवादांना सक्षम करणे हे आहे. परस्परसंवाद सार्वत्रिक शोधक्षमता व विश्वासाने सक्षम केले जातात आणि अभिप्रायावर आधारित असतात. तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांवर खालील ६ मुख्य क्रियापदे सक्षम केली जातील:




आकृती ६.२: तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांवर सक्रिय केलेले मुख्य क्रियापद

## ६.४ तंत्रज्ञानाचे घटक

रचना तत्त्वांच्या अनुषंगाने, एन. एम. आय. विविध तंत्रज्ञानाचे घटक प्रदान करते जे त्याच्या वापरकर्त्यांसाठी अनेक मार्गदर्शन उपाय सक्रिय करतात.




आकृती६.३: संयुक्त सदुपदेशन नेटवर्क (यूएमडब्ल्यू) - घटकांचा स्तरीय देखावा

**अ. सदुपदेशनग्रही प्रणाली (ॲप / वेबसाइट / इतर उपाय):** या प्रणालीचा वापर करून सदुपदेशनग्रही सदुपदेशक आणि सत्रांचा त्यांची आवड आणि गरज यांनुसार शोध घेऊ शकतात. त्यांना स्वारस्य असलेल्या सदुपदेशन कार्यक्रमांमध्ये ते नावनोंदणी करू शकतात.

**ब. सदुपदेशक प्रणाली:** सदुपदेशक या प्रणालीचा वापर करून त्यांच्या सदुपदेशनग्रहींबरोबरच्या परस्परसंवाद व सत्रांचे नियोजन करू शकतात. वेळोवेळी झालेल्या विविध परस्परसंवादातून मर्मज्ञान/अंतर्दृष्टी व विश्लेषणे देखील मिळवू शकतात.

**स. मार्गदर्शक वर्गीकरणः** एक राष्ट्रीय मार्गदर्शक वर्गीकरण विकसित केले जाईल आणि राष्ट्रीय पायाभूत सुविधांचा भाग म्हणून अंतर्भूत केले जाईल. या वर्गीकरणामध्ये मार्गदर्शकाची वैशिष्ट्ये, मार्गदर्शनाची क्षेत्रे आणि परस्परसंवादाची माध्यमे यासारख्या प्रमुख पैलूंचा समावेश असेल.

**ड. संयुक्त सदुपदेशन प्रणाली [युनिफाइड मेंटरिंग इंटरफेस (यूएमआय)] प्रवेशव्दारः** यूएमआय विविध सदुपदेशन सेवा/उपायांची आंतरसंचालनीयता सक्षम करेल ज्यामुळे विविध सेवांमध्ये उपलब्ध असणा-या सदुपदेशक / कार्यक्रमांचा शोध घेता येईल. मुक्त नियमांवर आधारित मुक्त नेटवर्क निर्माण करून अध्ययन/सदुपदेशन सेवांचे सुव्यवस्थापन करणे हे यूएमआयचे उद्दिष्ट आहे.

**ई. ॲप नोंदणीः** यामध्ये प्रणालीचा वापर करणाऱ्या सर्व मोबाइल ॲप्स, वेब पोर्टलस् आणि इतर उपायांची नोंदणी समाविष्ट आहे.

**फ. सेवा नोंदणीः** यात सदुपदेशन प्रणालींची (अनुप्रयोगांची) नोंदणी समाविष्ट आहे जी प्रवेशद्वारा (गेटवे) वर सबस्क्राइब केलेली असते.

**ग. बाह्य नोंदणीः** यामध्ये परिसंस्थेतील प्रमाणित सदुपदेशकांच्या विविध विकेंद्रीकृत विश्वासार्ह नोंदणी (शैक्षणिक संस्था, राज्य विभाग आणि सीएसओ) समाविष्ट आहेत.

**ह. सदुपदेशन सेवा:** पायाभूत सुविधांमधील सूक्ष्म सेवा सदुपदेशकांना त्यांच्या सत्रांचे नियोजन करण्यास आणि सदुपदेशक व सदुपदेशनग्रहींदरम्यान महत्वाच्या परस्परसंवादास सक्षम करेल.

## ६.५ संयुक्त सदुपदेशन प्रणाली

यू. एम. आय. ही बेकन डी. एस. ई. पी. वैशिष्ट्यांवर आधारित नेटवर्क प्रणाली आहे. हे नेटवर्क विविध प्रदाते आणि ग्राहकांना अखंडपणे संवाद साधण्याची परवानगी देते.

### ६.५.१ शोधक्षमता

सदुपदेशक (अनुभवी तज्ज्ञ व्यक्ती/निवृत्त प्राध्यापक/शिक्षक इ.) त्यांनी त्यांच्या उपकरणांवर कोणते ही सदुपदेशनाचे आवेदन केले असले तरीही हे सर्व एकाच प्रणालीवर दृश्यमान व संपर्क साधण्यासाठी उपलब्ध असतील. हे वापरकर्त्यांना संसाधनांशी जोडण्यासाठी अनेक अनुप्रयोग स्थापित करण्याऐवजी एकाच मंचावर सदुपदेशकांच्या मोठ्या गटामध्ये प्रवेश करण्यास अनुमती देईल.

### ६.५.२ विश्वास

प्रभावी सदुपदेशन तेव्हाच घडते जेव्हा मंचावर कार्यग्रस्त सर्व कलाकारांमध्ये विश्वास प्रस्थापित होतो. विविध शैक्षणिक संस्था आणि राज्य विभागांद्वारे विश्वासू सदुपदेशकांच्या नोंदणीद्वारे ट्रस्ट सक्षम केला जाईल. मंचावरील त्या सर्व विश्वासू सदुपदेशकांच्या प्रोफाइलचे पडताळणीयोग्य क्रेडेन्शियल सक्षम केले जाईल.

## ६.६ संयुक्त सदुपदेशन नेटवर्क :

एनएमआयचा सतत विकास, वापर आणि सुधारणेसाठी परिसंस्थेचा दृष्टिकोन विचारात घेतला जाईल. नावीन्य, विविधता आणि प्रासंगिकता आणण्यासाठी परिसंस्थेला सशक्त करणे आवश्यक आहे. यू. एम. एन. हा एन. एम. आय. मध्ये योगदान देण्यासाठी आणि त्याचा लाभ घेण्यासाठी विविध परिसंस्थेतील घटकांना उत्प्रेरित करण्याचा प्रयत्न असेल. अशा पायाभूत सुविधा भागधारकांच्या परिसंस्थेला वापर करण्यास त्यावर उपाययोजना तयार करण्यास आणि त्यांचे उपाय/सेवांचा विस्तार करण्याची परवानगी देते विशेषतः सदुपदेशनासाठी. हे मूलभूत मानसिकतेच्या बदलातून येते जे हे सुनिश्चित करतात की प्लॅटफॉर्म सर्वसमावेशक, एकसमान, एकमेव उपाय म्हणून तयार केला जात नाही.

हे नेटवर्क तयार करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी सर्व संबंधित भागधारकांसह नियमितपणे प्रयत्न केले जातील. मुलभूत घटक आणि मुक्त नियमावलीं (प्रोटोकॉल्स)चा समावेश असलेल्या पायाभूत सुविधांची तंत्र रचना सुनिश्चित करेल की हे नेटवर्क सतत वाढत राहील.

## ६.७ मंच (प्लॅटफॉर्म) प्रशासन

एनएमआयचा लाभ घेणाऱ्या सदुपदेशन कार्यक्रमाला अपेक्षित परिणाम साध्य केले जातील याची खात्री करण्यासाठी प्रभावी प्रशासन आवश्यक आहे. सुशासनासाठी, खालील निकष आणि प्रश्नांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**सारणी ६.१: निकष आणि प्रश्न**

| निकष | प्रश्न |
|---|---|
| **योग्यता** | • वापरकर्त्यांच्या स्थानिक आणि सामाजिक-आर्थिक परिस्थितीशी तांत्रिक पायाभूत सुविधा योग्य आणि सुसंगत असल्याची तुम्ही खात्री कशी करता?<br>• मंचावरील (प्लॅटफॉर्म) परस्परसंवाद रचनात्मक परस्परसंवादांवर आधारित आहेत याची तुम्ही खात्री कशी करता?<br>• पायाभूत सुविधांचा लाभ घेत असलेल्या कार्यक्रम मालकांद्वारे योग्य अभिप्राय यंत्रणा स्थापित केल्याची खात्री तुम्ही कशी करता? |
| **शाश्वतता** | • मंच (प्लॅटफॉर्म), डेटा इ. कोणाच्या मालकीचा आहे?<br>• मंच (प्लॅटफॉर्म) प्रभावीपणे वापरला गेला आहे आणि योग्य अभिप्राय विचारात घेतले गेला आहे याची तुम्ही खात्री कशी करता? यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम आणि अभिप्राय यंत्रणेचा समावेश असेल. |
| **उत्क्रांतता** | • तुम्ही अनेक अभिनेत्यांना संसाधनांमध्ये (उदा. डेटा, सॉफ्टवेअर, आशय इ.) योगदान देण्यासाठी कसे सक्षम करता?<br>• तुम्ही सेवांचा शोध आणि वापर कसा सक्षम करता?<br>• तुम्ही प्लॅटफॉर्मचा विस्तार कसा सक्षम करता? |

NATIONAL MISSION FOR
MENTORING

# प्रकरण ७ प्रवास आणि पुढील मार्ग



# प्रकरण ७: प्रवास आणि पुढील मार्ग

## ७.१ एन.एम.एम प्रवास

शिक्षण मंत्रालय (एमओई), भारत सरकार (GoI) यांचा आदेश म्हणून वर्ष २०२१-२२ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात एनएमएमची घोषणा करण्यात आली होती. एम. ओ. ई. ने पुढे हे काम पूर्ण करण्याची जबाबदारी एन.सी.टी.ई. कडे सोपवली. एन.एम.एम चा आराखडा विकसित करण्यासाठी अनेक संशोधनांची मालिका आयोजित केली गेली. विविध भागधारकांकडून सूचना/अभिप्राय मागवण्यासाठी नोव्हेंबर २०२१ मध्ये एन.सी.टी.ई. च्या संकेतस्थळावर आणि मायगव्ह (MyGov) पोर्टलवर सदुपदेशनावरील ब्लूबुकचा प्राथमिक मसुदा ठेवण्यात आला होता. त्यानंतर देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, शैक्षणिक प्रशासक, शाळा, विद्यापीठे, शिक्षक प्रशिक्षक, एस.सी.ई.आर.टी., डी.आय.ई. टी, प्राचार्य, शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि इतर भागधारकांसमवेत तळापासून वरच्या दृष्टिकोनासह सदुपदेशनावरील ब्लूबुक तयार करण्यासाठी माहिती/कल्पना गोळा करण्यासाठी १५ खुल्या सभागृहात चर्चा करण्यात आल्या. (संदर्भ. परिशिष्ट-४).

एन.सी.टी.ई. ने २९ जुलै २०२२ रोजी देशभरातील ३० केंद्रीय मालकीच्या शाळांमध्ये (१५ केंद्रीय विद्यालये, १० नवोदय विद्यालये आणि ५ सी.बी.एस.ई. शाळा) प्रायोगिक तत्वावर एन. एम. एम. कार्यरत केले. एन. एम. एम. वर २-दिवसीय उद्बोधन कार्यक्रम ३० शाळा मुख्याध्यापक आणि नोडल अधिकारी यांच्यासोबत आयोजित करण्यात आला. एन. सी. टी. ई. ने विविध क्षेत्रांतील ६० सदुपदेशकांची निवड केली आहे. ६० निवडक सदुपदेशकांसाठी 2 दिवसांचे क्षमता विकसन कार्यशाळेचे आयोजित करण्यात आले. एन.एम.एम वेब पोर्टल (संदर्भ. परिशिष्ट-५) सुरू करण्यात आले जे शोध, विश्वास आणि रचनात्मक अभिप्रायावर आधारित प्रभावी सदुपदेशन सत्रे आयोजित करणारी एक प्रणाली म्हणून काम करते. विविध मॉड्यूल्स विकसित करण्यात आले आहेत, जे मेंटर्सना प्रभावी आणि कार्यक्षम मार्गदर्शन संवाद साधण्यात मदत करतात.

वर नमूद केलेल्या अंतर्गत सल्लामसलत, १५ ओपन हाऊस चर्चा, प्रायोगिक तत्वावर मिळालेल्या सूचना, इतर भागधारकांच्या चर्चा आणि जनसंपर्क कार्यक्रमांच्या परिणामांबाबत प्राप्त अभिप्राय /सूचना समाविष्ट केल्यानंतर एन एम.एम. वरील ब्लूबुकला अंतिम रूप देण्यात आले आहे. एन.एम.एम.ची अंमलबजावणी, देखरेख आणि विश्लेषण सुलभ करण्यासाठी एन.सी.टी.ई मध्ये राष्ट्रीय शिक्षक गुणवत्ता केंद्र (National Centre for Teacher Quality (NCTQ) (एन.सी.टी.क्यू) या डिजिटल मंचाची स्थापना करण्यात आली आहे. यू.एम.आय चे संचालन एन.सी टी.क्यू कडून केले जाईल.

## ७.२ पुढील दिशा

शिक्षकांच्या व्यावसायिक वाढीसाठी आणि विकासासाठी एन. एम. एम. हा एक अमूल्य उपक्रम आहे. सदुपदेशकांची भूमिका त्यांच्या सदुपदेशनग्रहींना सदुपदेशन करणे, पाठबळ देणे आणि कौशल्य प्रदान करणे आहे. ज्ञानाची देवाणघेवाण, सहयोग आणि चिंतन करण्यासाठी हा एक मंच/व्यासपीठ आहे. एन. एम. एम. च्या अंमलबजावणी योजनेची संकल्पना खालीलप्रमाणे करण्यात आली आहेः

**सदुपदेशनग्रहींसाठी सदुपदेशन उपाय निर्मिती/एकत्रीकरण :**

- कार्यक्रम संसाधनांची निर्मिती/सहाय्यक साहित्य, एसओपी इ. जे सदुपदेशन कार्यक्रमांना मदत करतील.

**एनएमएम कार्यक्रमाची अंमलबजावणी**

- १००० सदुपदेशकांचा समूह तयार करणे
- सदुपदेशकांसाठी सदुपदेशन संसाधनांची निर्मिती/अनुवाद
- के.आर.पी./ सदुपदेशकांची क्षमता वाढवणे
- सदुपदेशकांना राष्ट्रीय पुरस्कार/प्रमाणपत्रे/ ते एन.पी.एस.टी. शी जोडून बिगर-आर्थिक प्रोत्साहन दिले जाईल.

**एन.सी.टी.ई. द्वारे संशोधन आणि पुनरावलोकन**

- कार्यक्रमाचे सातत्यपूर्ण मूल्यमापन
- सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रहींकडून अभिप्राय

आकृती ७.१: पुढील दिशा

## संदर्भ

Hansman, C. A. (Ed.). (2002). Critical perspectives on mentoring: Trends and issues. ERIC Clearinghouse on Adult, Career, and Vocational Education, Center on Education and Training for Employment, College of Education, the Ohio State University.

Knowles, M. S. (1980). The modern practice of adult education: From pedagogy to andragogy.

Englewood Cliffs, NJ: Cambridge Adult Education.

Kukreja, S., Arora, R., Mahajan, R., & Singh, T. (2020). Mentorship Program: Modern Outlook of Traditional Knowledge. International Journal of Applied and Basic Medical Research, 10(2), 65–67. https://doi.org/10.4103/ijabmr.IJABMR_109_20

Ministry of Human Resource Development. (2020, July 29). National Education Policy 2020. www.Education.Gov.In; Government of India.

https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_Final_English_0.pdf#page

=29&zoom=100,97,630

National Institute of Technical Teachers Training and Research. (2020, September). Making Mentoring Relevant: NEP 2020 PERSPECTIVE. NITTTR (nitttrc.ac.in); National Institute of Technical Teachers Training and Research. Retrieved from ReportonMakingMentoring.pdf (nitttrchd.ac.in)

National University of Educational Planning and Administration (NUEPA) New Delhi, Teachers in the Education System, How We Manage the Teacher Workforce in India. (2016).http://www.niepa.ac.in/download/Research/Teachers_in_the_Indian_Education_S ystem.pdf

National University Of Educational Planning And Administration (NUEPA) (2014) School Leadership Development National Program Design and Curriculum Framework. National University of Educational Planning and Administration (NUEPA) . https://www.education.gov.in/en/sites/upload_files/mhrd/files/upload_document/SLDP_Framework_NCSL_NUEPA.pdf

Parsloe, E., & Leedham, M. (2009). Coaching and mentoring: Practical conversations to improve learning. Kogan Page Publishers. Retrieved from https://rb.gy/9e732

Soka Gakkai. (2020). The Oneness of Mentor and Disciple. Soka Gakkai (Global). https://www.sokaglobal.org/resources/study-materials/buddhist-concepts/the-oneness-of-mentor-and-disciple.html#:~:text=In%20Buddhism%2C%20which%20is%20concerned,to%20free%20them%20from%20suffering

Together Platform. “Mentor Handbook.” Together Platform, https://www.togetherplatform.com/handbook/mentor. Accessed 16 Aug. 2021.

# परिशिष्टे

***परिशिष्ट १* सदुपदेशक निवडीसाठी संरचनात्मक रचनाः**

सदुपदेशक निवड प्रक्रियेसाठी शिफारस केलेली रचना.

***परिशिष्ट २* सदुपदेशकाची भूमिका आणि जबाबदाऱ्याः**

सदुपदेशन कार्यक्रमासाठी सदुपदेशकाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांची यादी तयार करताना सल्लामसलत करण्यासाठी एक नमुना साधन.

***परिशिष्ट ३* एन.एम.एम. साठी १५ खुल्या सभागृहात चर्चा**

***परिशिष्ट ४* एन.एम.एम. संकेतस्थळ (वेब पोर्टल)**

*परिशिष्ट-१*

*सदुपदेशक  निवडीसाठी संरचनात्मक रचना*

*सदुपदेशन कार्यक्रमासाठी*

# सदुपदेशकाची निवड

**उद्देशः** सदुपदेशन कार्यक्रमासाठी सदुपदेशकांच्या निवडीसाठी छाननी प्रक्रियेची रचना आणि अंमलबजावणी करणे.

साठी डिझाइन केलेले:

**कार्यक्रम रचनाकार/ योजक**

**कार्यक्रम व्यवस्थापक**

आदर्श सदुपदेशकाकडे असे काही विशिष्ट गुणवैशिष्ट्ये असतात, ज्यामुळे सदुपदेशक आणि सदुपदेशनग्रही हे दोघे ही तयार झालेल्या नातेसंबंधातून जास्तीत जास्त फायदा मिळवू शकतात.

## सदुपदेशकांची गुणवैशिष्ट्ये


विविधतेबाबत जागरूकता


प्रभावी संप्रेषण


सहानुभूती


अनुभव


लवचिकता


प्रेरणादायी


नेतृत्व कौशल्य


निपुणता


चिंतन


चिकित्सक विचार


सर्जनशीलता

संभाव्य सदुपदेशकांची आवश्यक गुणवैशिष्ट्यांसाठी छाननी प्रक्रिया वापरून चाचणी केली पाहिजे. कार्यक्रम कोणत्या प्रमाणात अंमलात आणणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन छाननी प्रक्रियेची रचना केली पाहिजे. उपलब्ध संसाधने आणि अर्जदार समूहाच्या आकारानुसार, निवड प्रक्रिया ही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने माहिती-संकलन पद्धती आणि वैयक्तिक कृतीकार्यक्रम आणि मुलाखती यांचे एकत्रीकरण करणे आवश्यक असू शकते.

*सदुपदेशन कार्यक्रमासाठी*

# सदुपदेशकाची निवड

## आवेदनपत्र



प्रारंभिक अर्जाचा वापर लोकसंख्याशास्त्र, मागील अनुभव, कौशल्याचे पुरावे इत्यादींवरील माहिती गोळा करण्यासाठी केला पाहिजे. ऑनलाईन शिक्षण व्यवस्थेतील आव्हाने सोडवण्याच्या सदुपदेशकांच्या दृष्टिकोनाचे/क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी अर्जामध्ये केस स्टडीचादेखील समावेश असू शकतो. हा फॉर्म अर्जदारांचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाणारे एकमेव साधन असू शकते (मोठ्या प्रमाणात कार्यक्रम; कमी संसाधनांची उपलब्धता) किंवा मुलाखतीसह (लहान-प्रमाणातील कार्यक्रम; उच्च संसाधन उपलब्धता) एकत्रीकरण करून वापरले जाऊ शकते.

## संवाद/मुलाखत



मुलाखत अर्जदाराला अधिक व्यक्तिनिष्ठपणे समजून घेण्यास आणि अर्जावर चाचणी करणे कठीण असलेल्या काही कौशल्यांचे विश्लेषण करण्यास मदत करू शकते. त्यात अर्जदारांच्या परस्परसंवादी गुणधर्मांची चाचणी घेणारे प्रश्न असू शकतात, जसे की चौकसपणा, सक्रियता, विश्लेषणात्मक तर्क इत्यादी.

ऑनलाइन फॉर्म, संबंधित डेटाबेस व्यवस्थापन प्रणाली, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग साधने इत्यादी साधने. आवेदनपत्रांचे सूत्रसंचलन करण्यासाठी, त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि त्यांचे विश्लेषण करण्यासाठी वापरले जाऊ शकते.

*सदुपदेशन कार्यक्रमासाठी*

# सदुपदेशक निवड

**लोकसंख्याशास्त्र**

- नाव
- संपर्क माहिती (फोन/पत्ता/ईमेल)
- भाषेतील प्राविण्य
- संलग्न संस्था (नाव, शहर, राज्य, देश)

**अनुभव**

- सध्याची भूमिका/पदनाम
- क्षेत्रात काम करण्याचा अनुभव
- सध्याच्या भूमिकेत काम करण्याचा अनुभव

**ज्ञान आणि निपुणता**

- प्रावीण्यतेची चाचणी घेण्यासाठी सदुपदेशन कार्यक्रमाच्या निर्धारित आशयावर आधारित प्रश्नावली
- सदुपदेशन कार्यक्रमाच्या आशयाशी निगडीत गतअनुभवांचा पुरावा - अध्यापनाच्या किंवा अध्ययनाच्या माध्यमातून
- संबंधित पुरस्कार, सन्मान, क्षेत्रातील कामगिरी

**सक्रियता**

त्यांना सदुपदेशक का व्हायचे आहे याबद्दल स्पष्टीकरण विचारणारे दिर्घोत्तरी/मुलाखतीचे प्रश्नः

- या कार्यक्रमासाठी अर्ज करण्याचा त्यांचा उद्देश काय आहे?
- ते कार्यक्रमात काय आणतील?
- त्यांना या कार्यक्रमाचा कसा फायदा होईल?
- या कार्यक्रमाचा शिक्षण प्रणालीला फायदा होईल याबद्दल ते कसा विचार करतात?

**लक्षपूर्वकता आणि विचारशीलता**

सदुपदेशन कार्यक्रमाद्वारे सोडवण्याच्या उद्देशाने संबंधित समस्यांवर प्रकाश टाकणारे व्यक्ति अभ्यास (केस स्टडीज).

अर्जामध्ये पाठपुरावा (फॉलो-अप) प्रश्न बहुपर्यायी किंवा व्यक्तिनिष्ठ असू शकतात किंवा त्यांच्या क्षमतेची चाचणी घेण्यासाठी व्यक्तिशः प्रश्न विचारले जाऊ शकतातः

- आव्हाने ओळखणे,
- योग्य पाठबळाची रचना करणे,
- सूचना आणि अभिप्राय तयार करणे,
- समस्या सोडवा,
- विविध नेतृत्व शैली समजून घेणे,
- मतभेद आणि निष्क्रियता हाताळणे आणि
- उत्तरे माहिती नसल्यास हाताळा.

**प्रेरणादायी आणि उत्प्रेरक**

ते त्यांच्या चमूला सतत शिकण्यासाठी आणि सुधारण्यासाठी कसे प्रेरित करतात याबद्दल स्पष्टीकरण विचारणारे व्हिडिओ

प्रॉम्प्ट/मुलाखत प्रश्न. अर्जदाराच्या क्षमतांसाठी प्रतिसादाची चाचणी यात केली केली जावीः

- सुस्पष्ट भाषण
- देहबोलीचा उचित वापर
- प्रश्नाचे उत्तर देणारे पुरेसे वर्णन
- चिंतनशील विचार व्यक्त केले
- उत्साही वक्तृत्व
- प्रेरणादायी कथाकथन

*परिशिष्ट - २*
*सदुपदेशकाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या*

*मार्गदर्शन कार्यक्रमासाठी*

# सदुपदेशकाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

**उद्दिष्ट:** यशस्वी सदुपदेशन सहयोगासाठी सदुपदेशकाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या ओळखणे.


**भूमिका:**

सदुपदेशक सदुपदेशनग्रहींशी चर्चा केलेल्या विशिष्ट ध्येयांवर आणि उद्दिष्टांवर आधारित मार्गदर्शन, सल्ला, अभिप्राय आणि पाठबळ प्रदान करतात.

**जबाबदाऱ्या:**


तयारी



पाठबळ


वृध्दिंगत होणे

- सदुपदेशनग्रहींशी नियमितपणे भेटण्याची आणि सहमतीनुसार सदुपदेशनाचा कालावधी संपेपर्यंत त्या संबंधांचे पोषण करण्याची वचनबद्धता.
- सदुपदेशनग्रहींसोबत विश्वासार्ह संबंध निर्माण करणे, सुरक्षित आणि सहायक वातावरण तयार करून गोपनीयता राखणे आणि सदुपदेशनग्रही आणि सदुपदेशक यांच्या मर्यादांचा आदर राखणे.
- सदुपदेशनग्रही-चालित नातेसंबंधासाठी जागा तयार करणे, जिथे सदुपदेशनग्रही आपल्या वाढ, विकास आणि करिअर नियोजनाची जबाबदारी स्वीकारतो.
- सदुपदेशन कृतीकार्यक्रमाचे सदुपदेशनग्रही आणि पर्यवेक्षकांशी सुस्पष्ट संवाद राखणे.


तयारी


पाठबळ


वृध्दिंगत होणे

- सदुपदेशनग्रहींसोबत योग्य नातेसंबंधासाठी, सदुपदेशनग्रहींची स्पष्ट उद्दिष्टे आणि ध्येय निश्चित करणे आणि त्या दृष्टीवर आधारित कृती योजनेबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.
- त्यांच्या स्वत:च्या प्रवासावर चिंतन करावे आणि आपल्या सदुपदेशनग्रहींसाठी तज्ज्ञता सामायिक करण्यासाठी संबंधित उदाहरणांचे स्पष्टोच्चारण करावे.


*सदुपदेशन कार्यक्रमासाठी*

# सदुपदेशकाची भूमिका आणि जबाबदाऱ्या

- सदुपदेशग्रहींच्या गटांसाठी प्रभावी सदुपदेशन सत्रांची सुविधा देण्यासाठी समस्येच्या भोवती फिरणा-या विचारशील चर्चांना प्रोत्साहन दिले जाते.
- त्यांच्या विविध सदुपदेशनग्रहींच्या दृष्टीकोनातील विविधता समजून घेणे व त्यांचे कौतुक करणे
- प्रेमळ पद्धतीने मतभेद ओळखणे आणि त्यावर काम करणे, सदुपदेशनग्रहींशी मतभेदांवर चर्चा करणे.
- समस्येबद्दलची त्यांची समज स्पष्ट करण्यासाठी तपशीलवार प्रश्न विचारणे (मुक्त 'कसे' आणि 'काय' प्रश्न).
- सदुपदेशनग्रहींचे लक्षपूर्वक ऐकणे आणि त्यांचे तुम्ही ऐकले आहे याची त्यांना जाणवून देणे.
- प्रगती साधण्यासाठी सदुपदेशनग्रहींना सोयीस्कर आव्हाने दिली जातात आणि सध्याच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच भविष्यासाठी सामना करण्याची धोरणे विकसित करण्यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठी गुंतवले जाते.
- सदुपदेशनग्रहींच्या गरजांनुसार त्यांना दिले जाणारे समर्थन वेगवेगळे करणे.
- प्रामाणिक, मुक्त, सकारात्मक आणि रचनात्मक अभिप्राय प्रदान करणे
- व्यावसायिक विकास उपक्रम ओळखण्यासाठी, योग्य संसाधने आणि आवश्यकतेनुसार इतर सदुपदेशकांशी संपर्क साधण्यात आणि नेटवर्किंग करण्यात सदुपदेशनग्रहींना मदत करणे.
- सदुपदेशनग्रहींना त्यांच्या सहनिर्मित कृती योजनेंसाठी व नियमित अंतराने कृती योजनेचे पुनरावलोकन करण्यासाठी जबाबदार धरणे.


तयारी


पाठबळ


वृध्दिंगत होणे

- त्यांची नोकरी आणि त्यांच्या सदुपदेशनाच्या जबाबदाऱ्या यांसाठी वेळेचे प्रभावीपणे व्यवस्थापन करणे
- प्रशिक्षण, अभिप्राय चक्र इ.मधून सदुपदेशनाची कौशल्ये निर्मिती व विकसीत करण्यासाठी व्यावसायिक विकासामध्ये गुंतवणे.

***परिशिष्ट -३***

***एन. एम. एम. साठी १५ खुल्या सभागृहात चर्चा***

## एन. एम. एम. वरील खुल्या सभागृहात झालेल्या चर्चेची यादी

| अनु.क्र. | संस्थेचे/विद्यापीठाचे नाव | चर्चेची पद्धत | दिनांक | राज्ये/केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे |
|---|---|---|---|---|
| 1. | कॉटन विद्यापीठ, गुवाहाटी, आसाम | प्रत्यक्ष | १६.११.२०२१ | आसाम, पश्चिम बंगाल, अरुणाचल प्रदेश |
| 2. | एस.सी.ई.आर.टी गंगटोक, सिक्कीम | मिश्रित | १०.१२.२०२१ | सिक्कीम, मिझोराम |
| 3. | एस.सी.ई.आर.टी जम्मू आणि काश्मीर | मिश्रित | १३.१२.२०२१ | जम्मू-काश्मीर आणि लडाख |
| 4. | एस.सी.ई.आर.टी पटणा, बिहार | मिश्रित | १५.१२.२०२१ | बिहार, झारखंड |
| 5. | दिल्ली विद्यापीठ | प्रत्यक्ष | १६.१२.२०२१ | दिल्ली, हरियाणा |
| 6. | बनस्थली विद्यापीठ, राजस्थान | मिश्रित | १७.१२.२०२१ | राजस्थान |
| 7. | उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद | मिश्रित | १८.१२.२०२१ | तेलंगणा, आंध्र प्रदेश |
| 8. | एस.सी.ई.आर.टी पुणे, महाराष्ट्र | मिश्रित | २८.१२.२०२१ | महाराष्ट्र, गोवा |
| 9. | भारतीय शिक्षक शिक्षण संस्था, गांधीनगर, गुजरात | प्रत्यक्ष | ३०.१२.२०२१ | गुजरात |
| 10. | बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी, उत्तर प्रदेश | मिश्रित | १२.०१.२०२२ | उत्तर प्रदेश |
| 11. | एस.सी.ई.आरटी भोपाळ, मध्य प्रदेश | मिश्रित | १७.०१.२०२२ | मध्य प्रदेश |
| 12. | एस.सी.ई.आर.टी हिमाचल प्रदेश | मिश्रित | २०.०१.२०२२ | हिमाचल प्रदेश |
| 13. | एस.सी.ई.आर.टी पंजाब | मिश्रित | २४.०१.२०२२ | पंजाब |
| 14. | हरियाणा केंद्रीय विद्यापीठ | मिश्रित | ०४.०३.२०२२ | हरियाणा आणि चंदीगड |
| 15. | शालेय शिक्षण संचालनालय, पॉंडिचेरी | प्रत्यक्ष | ०७.०३.२०२२ | पॉंडिचेरी |

*परिशिष्ट - ४*
*एन.एम.एम वेब पोर्टल*

## एएन.एम.एम साठी वेब पोर्टल सदुपदेशकांसाठी

१. लॉगिन करा



## २. माझे प्रोफाइल



Sangita Pradhan

★★★★★

**Language(s) Known**

| Sr. No. | Language | Speak | Read | Write |
|---|---|---|---|---|
| 1. | Hindi | ☑ | ☑ | ☑ |
| 2. | Marathi | ☑ | ☑ | ☑ |
| 3. | English | ☑ | ☑ | ☑ |

| | |
|---|---|
| Registration No. | MTR000064 |
| Full Name | Sangita Pradhan |
| Email | sangita********@gmail.com |
| Contact Number | 954******* |
| Gender | Female |
| Address | Ganganagar, Rajasthan |
| **Languages** | **English** |
| **Role** | **Teacher (Primary)** |
| **Area of Mentoring** | **Instructional Leadership Skills - Social Science** |
| **Professional Experience (in years)** | **15+** |

**About Yourself**

Credited with extensive experience and professionalism having numerous key responsibilities in the field of education. Around 20 years of experience as an art educator. Always been passionate about teaching, focussed on vigorous planning & implementation at both State and National levels in various capacities. More..

| **Current Work Status** | **Name of the organisation/school** (If retired, please mention the name of the school/organisation last worked at) |
|---|---|
| Working | **Kendriya Vidyalaya, Ganganagar** |


**Click Here to Update your Profile**

१. सदुपदेशनग्रहींची नोंदणी

**एन. एम. एम. साठी वेब पोर्टल**
सदुपदेशनग्रहीसाठी



१. सदुपदेशनग्रहींची नोंदणी


Mentee Profile

Basic Information | Language Proficiency | Mentoring Required For

| | | | |
|---|---|---|---|
| Registration No. | 4 | | |
| First Name* | Somit | Last Name | Mishra |
| Gender* | Male | Email ID* | ncte.mentee@gmail.com |
| Mobile Number * | 888888888 | State* | ASSAM |
| District / City* | GUWAHATI | Pin Code* | 781022 |
| Organisation Type* | Central Board of Secondary Education ( CBSE ) | Name of the School/Institutions* | Kendriya Vidyalaya, Khanapar |
| Your Experience in years* | 6-8 | | |
| Language* | English x Dogri x + Add | | |
| Stage* | Primary x Select | | |
| Role* | Teacher (Primary) x Teacher (Upper Primary) x Teacher (Secondary) x + Add | | |

Update

## ३. सदुपदेशकांसाठी अभिप्राय

Somit Mishra

### Feedback for Mentor: Sangeeta Pradhan (Instructional Leadership Skills-Social Science)

On a Scale of I to V, V being the highest

| Sr. No. | Questions | V | VI | III | II | I |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | How effective was the mentor in providing guidance and support during your interactions? | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 2. | How much did the mentor challenge you to think critically and independently? | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3. | How effective was the mentor in providing guidance and support during your interactions? | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 4. | To what extent was the mentor able to create a comfortable and safe environment for open communication and learning? | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 5. | Refrain from encouraging mentees to ask questions during the discussion | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

**Other Remarks (If any)**

It was an insightful learning experience. The mentor was supportive throughout the session.

राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद्
(भारत सरकार का एक सांविधिक निकाय)

National Council for Teacher Education
(A Statutory Body of the Government of India)

By e-mail / Hand / Speed Post / Fax

File No. NCTE-Acad013/3/2021-Academic Section-HQ 20th September 2021

**OFFICE ORDER**

In supersession to office order of even number dated 31st August 2021, a Committee is constituted to work out the modalities for the creation of a national document and an online platform for Mentoring in Teacher Education at National Council for Teacher Education (NCTE) under National Mission for Mentoring. The details of the committee are given below:

| S. No. | Name and Organization | Designation |
|---|---|---|
| 1. | **Prof. S.C. Roy,**<br>North Eastern Regional Institute of Education, Shillong | Chairperson |
| 2. | **Dr. Ashok Pandey,**<br>Director, Ahlcon International School, Mayur Vihar Phase 1 Delhi | Member |
| 3. | **Prof. Sharad Sinha,**<br>NCERT | Member |
| 4. | **Ms. Kalpana Kapoor**<br>Educationist, Mentor and Leadership Coach | Member |
| 5. | **Shri Sushant Tharappan**<br>Head, Infosys Leadership Institute | Member |
| 6. | **Shri Jagdish Babu,**<br>Chief Operating Officer, Ekstep Foundation. | Member |
| 7. | **Shri Sanjay Purohit,**<br>Chief Curator, Societal Platform | Member |
| 8. | **Dr. Amina Charania,**<br>Associate Professor,<br>Tata Institute of Social Sciences, Mumbai | Member |
| 9. | **Ms. Khushboo Awasthi**<br>Chief Operating Officer, ShikshaLokam. | Member |
| 10. | **Shri Sushil Bhardwaj**<br>State co-ordinator, Punjab | Member |
| 11. | **Shri Abhimanyu Yadav,**<br>Section Officer, National Council of Teacher Education, New Delhi | Convener |

Cont. 2/-

जी-7, सेक्टर-10, द्वारका, नई दिल्ली -110075
G-7, Sector-10, Dwarka, New Delhi - 110075
Phone : +91-11-20893266, Fax : +91-11-20893270 Email : ms@ncte-india.org
Website : www.ncte.gov.in

-2-

| | | |
|---|---|---|
| 12. | **Ms. Monika Mishra**<br>Academic Consultant, NCTE | Co-convener |
| 13. | **Ms. Shailla Draboo**<br>Academic Consultant, NCTE | Co-convener |

**2. The Terms of Reference (ToR):**

i. Various sub-committees may be formed from among these members by the chairperson of the committee as per need.

ii. Identification of the focus areas and structured planning for mentoring including formulation of programmatic norms for the effective implementation of the mission as per the directive of NEP 2020.

iii. Formulation of norms for cross linking of experts from school to college.

iv. Review of data and membership received through digital consultation /institutional consultation.

v. Development of the manual on National Mission on Mentoring (NMM) containing guidelines for the prospective mentors and mentees which may be adapted/ adopted by the states /UTs in their own chapters of State Mentoring Mission.

vi. Setting up of Data Strategy Center for the NMM, at the national and regional levels in the headquarters of the National Council for Teachers Education (NCTE).

vii. Preparation of the short term and long-term mentoring manual on Indian languages and subjects specifically for underrepresented population targets groups etc.

viii. Formulation of guidelines for tapping up the potential of senior experienced and retired teachers and also include experts drawn from different sections of societies including professionals from different sectors such as engineering, medical, subject expert teachers, defense personnel, craft persons, trade persons music and dance practitioners etc.

ix. Developing and designing of platform for mentoring including matching of mentor and mentees, agreement and certainty matrix.

x. Chalking out the strategies for reaching out to the target audience of NMM, monitoring and their communication process.

xi. The detailed plan of Action on pilot run of NMM and development of the framework for the national level pool of mentors and mentees.

xii. The Chairperson of the Committee may co-opt other experts to the committee as per need.

2. The committee is expected to submit the complete report along with a plan of Action within a period of 3 months from 31st August 2021.

Cont. 3/-

-3-

3. The NCTE shall provide secretarial assistance for holding of virtual and face to face meetings of the committee and arrangements for payments of TA /DA /Sitting charges as per NCTE norms.

This has the approval of the competent authority.

**(Kesang Y. Sherpa, IRS)**
**Member Secretary, NCTE**

**Copy to:**

1. PS/SO to CP/MS for information please.
2. Deputy Secretary /Under Secretary GA/Academics/Accounts, NCTE
3. Copy to all members etc.
4. Guard /Office file.

NATIONAL MISSION FOR MENTORING

Azadi Ka Amrit Mahotsav

G20 भारत 2023 INDIA

परिच्छेद १५.११, एन.ई.पी २०२०

शालेय शिक्षकांना अल्पकालीन आणि दीर्घकालीन सदुपदेशन /व्यावसायिक सहाय्य पुरविण्यास इच्छुक असलेल्या उत्कृष्ट व्यावसायिकांच्या मोठ्या समूहासह राष्ट्रीय सदुपदेशन अभियान स्थापन केले जाईल
.


NTM

Language consultancy and translation facilitated by

**National Translation Mission**

Central Institute of Indian Languages, Mysore


गुरूर्गुरूतमो धाम

NCTE

# राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद

(भारत सरकारची वैधानिक संस्था)

## National Council for Teacher Education

(A Statutory Body of Government of India)